बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक २२ | बुधवार,दि.०७ मे २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027

# ओबीसी आरक्षणासह ४ महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच बिगूल वाजणार?

**नवी दिल्ली–** महाराष्ट्रातील महानगरपालिका आणि नगरपालिका निवडणुकांबाबत आज सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता येत्या चार महिन्यांत घेण्याचे निर्देश कोर्टाने दिल्याने निवडणूक प्रक्रियेला गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्पष्ट केले की, पुढील चार आठवड्यांत निवडणुकीसंबंधी अधिसूचना काढावी आणि त्यानंतर चार महिन्यांच्या आत निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करावी. त्यामुळे मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरसह राज्यातील इतर अनेक महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुका आता लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.



राज्यातील पंचायत निवडणुकीतील ओबीसी आरक्षण प्रकरणावर सुनावणी करताना ही कार्यवाही झाली. याचिकाकर्त्यांतर्फे इंदिरा जयसिंह यांनी सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, निवडून आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यकाळ संपल्यानंतर अधिकाऱ्यांकडून प्रशासन चालवले जात आहे. त्यावर न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले की, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुका १९९४ ते २०२२ दरम्यानच्या २७ टक्के ओबीसी आरक्षण स्थितीनुसार घेण्यात याव्यात.

न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी टिप्पणी करताना म्हटले की, ङ्गआरक्षण हे रेल्वेच्या डब्यासारखे झाले आहे; ज्यांनी प्रवेश मिळवला ते आता इतरांना प्रवेश देण्यास तयार नाहीत.ङ्ग त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, फक्त काही विशिष्ट गटांनाच आरक्षण का मिळावे? सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या मागासलेल्या इतर गटांनाही आरक्षण मिळावे, हा विचार राज्यांनी करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

कोर्टाने स्पष्टपणे सांगितले की, राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाने मिळालेल्या वेळेत निवडणूक प्रक्रिया राबवावी. तसेच ओबीसींच्या जागांमध्ये कपात केल्याचा याचिकाकर्त्यांचा दावा फेटाळून लावत, २०२२ पूर्वीचीच स्थिती कायम ठेवण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.

# जिल्हा परिषद शाळांचा दर्जा वाढविण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची-जि.प.उपाध्यक्ष हर्षे



**गोंदिया:–** जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती सुरेश हर्षे यांच्या पुढाकारातून प्राथमिक शिक्षण विभागाच्या माध्यमातून नवीन शैक्षणिक वर्षातील पुर्वतयारी नियोजनाला घेऊन जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांचे केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या सहविचार सभेचे तसेच शिष्यवृत्ती परिक्षेत उत्तीर्ण २९ विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभाचे आयोजन येथील पोवार बोर्डींग सभागृहात नुकतेच पार पडले. या सहविचार सभेला मुख्याध्यापक,अधिकारी व पदाधिकारी यांनी आपली उपस्थिती नोंदवली.

शिक्षक हा देशाच्या भविष्य घडवणारा व आम्हा सर्वंचा गुरु आहे आणि येणाऱ्या काळामध्ये प्रत्येक शिक्षकांनी गुरुवरची भूमिका अदा करत सामान्य जनतेचे विश्वास जिंकावे.गावातील पालकाच्या भेटीगाठी पालकाची सहविचार व विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाची माहिती पालकापर्यंत कशी पोहोचता येईल व पालकांना विद्यार्थ्यांमध्ये असलेली गुणवत्ता व कमतरता कळवावे. प्रत्येक महिन्याला घटक चाचणीच्या माध्यमातून प्रत्येक शाळेला चाचणी घ्यावी जेणेकरून आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धेमध्ये टिकले पाहिजे. जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी उत्तीर्णच्या प्रमाण बघितलं किंवा गुणवत्ता बघितली तर जिल्हा परिषद शाळा कुठेही मागे नाही फक्त प्रचार प्रसार व आत्मविश्वास वाढवून काम करण्याची शिक्षक व शिक्षण विभागाला आवश्यकता असल्याबाबत मत व्यक्त केले. त्याचबरोबर प्रत्येक गावामध्ये स्वयं अर्थसहाय्य ग्रामपंचायत शाळा समिती व शिक्षकांनी सहकार्यांनी कॉनवेंट सुरू व्हावी जेणेकरून बालपणापासून त्याला इंग्रजी विषयी यायला पाहिजे जेणेकरून सीबीएससी पॅटर्नच्या माध्यमातून त्याला सहजतेने गुणवत्ता प्राप्त करता येईल त्याचप्रमाणे आता ग्रामीण क्षेत्रांमध्ये पण शासनाच्या धोरणामुळे प्रत्येक गावाला सीबीएससी अभ्यासक्रम सुरू होत असलेल्या बाबत शिक्षकांनी, मुख्याध्यापकांनी पालकांना सांगावं व ज्या शासन स्तर किंवा जिल्हा परिषद स्तर असलेल्या शिक्षकांचे प्रश्न वेळी कसे मार्गी लावता येतील याकरिता प्रत्येक महिन्याला किंवा दोन महिन्यांनी आपण संघटनांशी बोलून प्रश्न मार्गी लावू व जिल्हा परिषद स्तर राज्यस्तर टप्प्याटप्प्याने कसा सोडवता येईल हा प्रयत्न करू याप्रमाणे शिक्षकांना आव्हान केले. आपल्या जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कशी वाढेल व गुणवत्तापूर्वक शिक्षण कसं मिळेल याकरिता जिल्हा परिषदेपासून राबवत असलेल्या योजनेबाबत पाठपुरावा सादर करत संपूर्ण जिल्हा परिषदेची माहिती आढावा सभेला सहविचार सभेला सादर केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर होते. मार्गदर्शक म्हणून जि.प. उपाध्यक्ष तथा शिक्षण व आरोग्य सभापती सुरेश यशवंतराव हर्षे, बांधकाम व अर्थ सभापती डॉ.लक्ष्मण भगत, कृषी व पशुसंवर्धन सभापती दीपाताई चंद्रीकापुरे, महिला व बालकल्याण सभापती पौर्णिमाताई ढेंगे उपस्थित होते.यावेळी जि.प.सदस्य सौ.सविता पुराम, सौ.पूजाताई सेठ, सौ.रचनाताई गहाणे. सौ.तुमेश्वरी बघेले, सौ. अश्विनीताई पटले, जि.प.सदस्य शैलेश नंदेश्वर,शसेंद्र भगत,वंदना काळे, निशा तोडासे, अंजलीताई अटरे, सौ.छायाताई नागपुरे, छबूताई उके, आनंदाताई वाडीवा, वैशालीताई पंधरे, सौ नेहा तुरकर, सुधाताई रहांगडाले, जयश्रीताई देशमुख, लक्ष्मी तरोणे, विमलताई कटरे, रीतेशकुमार मलगाम, माध्य. शिक्षणाधिकारी महेंद्र गजभिये, उपशिक्षणाधिकारी अशोक लांडे, विस्तार अधिकारी डी.बी दिघोरे, एम.जी.डहाके, शिक्षण विभागातील अधिकारी कर्मचारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, नवोदय शाळेचे शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेचे प्रास्ताविक प्राथमिक शिक्षणाधिकारी सुधीर महामुनी यांनी केले. शासन स्तरावरून शासकीय जिल्हा परिषद शाळेला वेळोवेळी होत असलेले मार्गदर्शन, नवीन उपक्रम प्रशिक्षण व तंत्रज्ञान, जिल्हा परिषद शाळेला उपलब्ध होत असलेले सर्व प्रशिक्षण सेवा याबाबत माहिती दिली.

# बुधवारी मॉक ड्रिल होणार म्हणजे नक्की काय होणार?

**नवी दिल्ली :** पहलगाममध्ये झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर भारत – पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढू लागला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृह मंत्रालयाने देशात निवडक ठिकाणी बुधवार ७ मे २०२५ रोजी नागरी संरक्षण मॉक ड्रिल घेण्यास सांगितले आहे. सायरन वाजवून चाचणी घ्या, असे निर्देश देण्यात आले आहेत. हा आदेश येताच जुन्या पिढीतील अनेकांच्या १९७१ आणि १९६५ च्या लढाईच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत.

वैद्यकीय आणीबाणी, भूकंप,



आग, स्फोट, हवाई हल्ला अशा आणीबाणीत स्वतःच्या रक्षणासाठी करायच्या उपायांचा प्रत्यक्ष कृती करुन केलेला सराव म्हणजे मॉक ड्रिल.

महाराष्ट्रात १६ ठिकाणी बुधवार ७ मे २०२५ रोजी मॉक ड्रिल होणार आहे. शत्रूने हवाई हल्ला केल्यास स्वतःचे आणि जमल्यास इतरांचे कसे संरक्षण करायचे याचे प्रशिक्षण महाराष्ट्रातील मॉक ड्रिल दरम्यान दिले जाणार आहे. युद्धजन्य परिस्थितीसाठी राज्यातील नागरी आणि लष्करी यंत्रणा किती सज्ज आहे याचीही तपासणी केली जाणार आहे. ब्लॅकआऊट कसे करायचे आणि ब्लॅकआऊट काळात कसे वागावे याचेही प्रशिक्षण दिले जाणार आहे.

भारतातील २४४ जिल्ह्यांमध्ये मॉकड्रिल होणार आहे. यात महाराष्ट्रातील १६ ठिकाणांचा समावेश आहेत. महाराष्ट्रात मुंबई, उरण आणि तारापूर येथे कॅटेगरी वनची मॉकड्रिल होणार आहे. ठाणे, पुणे, नाशिक, रोहा – धाताव – नागोठणे, मनमाड, सिन्नर, थळ वायशेत, पिंपरी – चिंचवड येथे कॅटेगरी टूची मॉकड्रिल होणार आहे. छत्रपती संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथे कॅटेगरी थ्रीची मॉकड्रिल होणार आहे.

मॉक ड्रिल सुरक्षा प्रशिक्षणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. या ड्रिलमुळे व्यक्ती आपत्कालीन परिस्थितीत स्वतःला आणि शक्य असल्यास इतरांना वाचवण्यास सक्षम होते. दुखापत किंवा नुकसान होण्याचा धोका कमी करण्यास मदत होते. लढाईची शक्यता असल्यास नागरी संरक्षण मॉक ड्रिल घेतल्या जातात. यात प्रामुख्याने हवाई हल्ल्यापासून स्वतःचे रक्षण करणे, इमारतीची पडझड झाली अथवा आग लागली तर स्वतःचे आणि जमल्यास इतरांचे रक्षण करण्यासाठी प्रशिक्षण दले जाते. आग विझवण्यासाठी करायच्या मदतीचे आणि वैद्यकीय पथकाला करायच्या मदतीचे प्रशिक्षण निवडक सदस्यांना दिले जाते.

**ब्लॅकआऊट म्हणजे काय ?**

ब्लॅकआऊट म्हणजे पूर्ण अंधार. सर्व दिवे बंद. रात्रीच्या वेळी जेव्हा जेव्हा सायरन वाजतो तेव्हा कुठेही दिवे दिसू नयेत. प्रकाशाचा अंधुकसा किरणही दिसू नये याची खबरदारी घेतली जाते. हवाई हल्ल्यापासून संरक्षणासाठी हा उपाय करतात. जर तुम्ही घराच्या आत काम करत असाल आणि तुम्हाला प्रकाशाची गरज असेल तर सर्व खिडक्या काळ्या पडद्याने झाकून टाकतात.

प्रकाशात शत्रूचे विमान लांबून दिसू शकते. यामुळे अनेकदा विमान हल्ले हे रात्रीच्या वेळी होतात. शत्रूच्या लढाऊ विमानाला रात्री आकाशातून जाताना खाली प्रकाश दिसणार नाही, नागरी वस्तीचे अस्तित्व लक्षात येणार नाही याची काळजी घेऊन मनुष्यहानी टाळण्यासाठी ब्लॅकआऊट करतात.

इस्त्रायलची लोकसंख्या भारताच्या तुलनेत कमी आहे. यामुळे तिथे प्रत्येक इमारतीखाली मोठे भक्कम बंकर बांधले जातात. भारतात सीमेजवळ ग्रामस्थांसाठी बंकर आहेत. पण देशात इतरत्र अशी व्यवस्था नाही. १९६५ आणि १९७१ मध्ये युद्धाच्या आधी तणाव वाढू लागताच देशात ठिकठिकाणी खंदक खणण्यात आले. सायरन वाजताच सर्वजण आपापल्या खंदकांकडे जात असत. जिथे खंदक नव्हते तिथे लोक जमिनीवर झोपायचे. रस्त्यावर जी काही वाहने धावत असत ती एका बाजूला पार्क करायची आणि संपूर्ण रस्ता रिकामा व्हायचा. आता पुन्हा तशीच तयारी करावी लागेल, असे तज्ज्ञ सांगत आहेत.

# अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत जाहीर करा :राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी



**गोंदिया:**जिल्हयातील धान, मक्का, भाजीपाला, फळबागे तसेच गाव खेडयामध्ये मोठया प्रमाणावर मातीचे घरे व गुरांचे गोठयांच्या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करुन सरसकट तातडीने आर्थिक मदत करण्याच्या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्यावतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फेत मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री व पालकमंत्र्यांना पाठविण्यात आले. खासदार प्रफुल पटेल यांच्या सूचनेनुसार माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या नेतृत्त्वात हे निवेदन देण्यात आले.

जिल्हयात होत आललेल्या अवकाळी पावसामुळे व गारपिटी मुळे ग्रामीण व शहरी भागातील मोठ्या प्रमाणात घरे व गुरांची गोठे क्षतिग्रस्त होऊन नुकसान झाले आहे. तसेच शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांच्या नुकसानीमुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. जिल्हयात धानाचे पिक मोठया प्रमाणावर असुन धान पिकाची नुकसान झालेली आहे. त्यामुळे झालेल्या सर्व नुकसानीचे पंचनामे तातडीने करून जास्तीत जास्त नुकसान भरपाई देण्यात यावी याबाबतचे निवेदन राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाच्या वतीने जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व पालकमंत्री यांना निवेदन देण्यात आले.

निवेदन देतांना माजी आमदार राजेन्द्र जैन, जि.प.उपाध्यक्ष सुरेश हर्षे, पूजा अखिलेश सेठ, जि.ा प.सदस्य जगदीश बावनथडे, जि. प.सदस्या अश्विनी रविकुमार पटले, शिवलाल जमरे, अखिलेश सेठ, नीरज उपवंशी, कीर्ती पटले, रविकुमार (बंटी) पटले, नितीन टेम्भरे, पंकज चौधरी, सुनील पटले, लीकेश चिखलोंडे, शिवलाल नेवारे, चुन्नीलाल शहारे, राकेश वर्मा, रौनक ठाकूर, ग्राम पंचायत सदस्य संजय चौरे आदी कार्यकर्ता उपस्थित होते.

# आमगाव तालुक्यात चार ‘सारस’ पक्ष्यांची नोंद

**गोंदिया:–** राज्यात केवळ गोंदिया जिल्ह्यात आढळणाऱ्या व सध्या आपल्या अस्तित्वासाठी लढत असलेल्या सारस पक्ष्याची पहिल्यांदाच आमगाव तालुक्यात नोंद करण्यात आली आहे. चार पक्ष्यांचा मुक्त संचार नजरेस पडत असून यामुळे सारस पक्षीप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

आमगाव देवरी मार्गावरील शहराला लागून तब्बल चार सारस पक्ष्यांचा मुक्त संचार नागरिकांना दिसून आला आहे. सारस पक्ष्यांमुळे गोंदिया जिल्ह्यात एक वेगळी ओळख प्राप्त झाली आहे. असे असले तरी मानवी हस्तक्षेप शिकार आदी कारणांने या पक्ष्यांचे अधिवास क्षेत्र कमी होऊ लागले आहे.

आमगाव देवरी मार्गावरील आमगाव लगतच्या ए. एस. वलथरे यांच्या घरामागील शेतशिवारात सारसची दोन जोडपी मुक्त संचार करताना आढळून आली. यावेळी काहींनी या सारस जोडप्यांचे फोटो तर काही चित्रफिती काढून समाज माध्यमावर प्रकाशित केल्या.

# मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हस्ते जलरथाचे उद्घाटन

**गोंदिया :–** शासनाने ङ्गगाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवारफ ही योजना कायमस्वरुपी राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेच्या प्रचार–प्रसार व जनजागृती करण्यासाठी गोंदिया जिल्हा व संपूर्ण महाराष्ट्रामध्ये भारतीय जैन संघटन व सहयोगी सुहाना स्पाईसेस यांच्याद्वारे गोंदिया जिल्ह्यामध्ये जनजागृती करणाऱ्या जलरथाचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम व निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी सत्यजीत राऊत, सहायक अधीक्षक संजय धार्मिक, सहायक महसूल अधिकारी सर्वश्री पी.झेड.बिसेन, अमोल गजभिये, नोकलाल कटरे, माधुरी मेश्राम, सोनाली भोयर, हरिश्चंद्र पौनीकर (डीपीएम), योगेश वैकुंठी (नरेगा), बिजेएस पदाधिकारी गोरेगाव सौरभ जैन, बिजेएस जिल्हा समन्वयक



रोशन गायधने उपस्थित होते.

जलरथाद्वारे गावा–गावामध्ये जाऊन तलावाचे पुनरुज्जीवन करण्याकरीता माहिती देवून मागणी अर्ज करण्याकरीता महाराष्ट्र शासनाचे शिवार पोर्टल व बिजेएस ॲपची माहिती देऊन मागणी अर्ज करण्याबाबत, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मोफत गाळाचे महत्व, तलावाचे पुनरुज्जीवन करण्याचे फायदे, शेत शिवारामध्ये माती टाकल्याने होणारे फायदे इत्यादी माहिती जलरथाद्वारे पुरविली जाणार आहे.

तलावातील गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च शासन करणार असून यासाठी महाराष्ट्र राज्यात एकच दर निश्चित करण्यात आलेला आहे. पात्र स्वयंसेवी संस्था किंवा ग्रामपंचायत या कामासाठी अर्ज करुन जिल्हा प्रशासनाने दिलेल्या पध्दतीनुसार काम करता येईल.

तलावातून काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी व आत्महत्याग्रस्त कुटूंब शेतकऱ्यांना शासनाकडून निश्चित दराने अनुदान दिले जाणार आहे.

# ‘एनआरएचएम’च्या कर्मचाऱ्यांचे असहकार आंदोलन

**गोंदिया:–** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना चार महिन्यांपासून पगार न मिळाल्याने त्यांच्या कुटुंबांवरील आर्थिक संकट अधिकच गडद झाले आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांनी पगाराच्या मागणीसाठी असहकार आंदोलन सुरू केले आहे. ऑनलाईनसह ऑफलाईन कामे देखील बंद करण्यात आले असून वेतन न झाल्यास येत्या १२ मेपासून कामबंद आंदोलन पुकारण्याचा इशारा देण्यात आला आहे.

आरोग्य कर्मचाऱ्यांना फ्रंटलाइन वर्कर म्हणतात. कोरोना काळात आरोग्य कर्मचाऱ्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालत रुग्णांची सेवा केली. असे असूनही आरोग्य कर्मचाऱ्यांच्या समस्यांकडे शासनाने लक्ष दिले नाही. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सेवा देणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना गेल्या चार महिन्यांपासून पगार देण्यात आलेला नाही, अशी माहिती राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी अधिकारी, कर्मचारी कृती समिती यांनी दिली. या मुद्द्यावर अनेक वेळा चर्चा आणि निषेधही झाले. पण आश्वासनांशिवाय काहीही मिळाले नाही. पगार न मिळाल्यामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळत आहे. या मागणीबाबत शुक्रवारी (दि.२) पासून असहकार आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

ऑनलाइन किंवा ऑफलाइन काम न करता, रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी सेवा दिली जात आहे. १५ व्या वित्त आयोगाचा निधी आरोग्य विभागाला उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. १२ मे पर्यंत प्रलंबित वेतन न दिल्यास संप करण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे. त्यासंदर्भात संघटनेमार्फत मुख्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव, राज्य आयुक्त तसेच जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना इशारा पत्र देण्यात आले आहे.

# “जनसंपर्कतज्ज्ञ:प्रा.सुरेश पुरी लोकपत्रकारिता”पुरस्काराची घोषणा!

## ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते अमर हबीब पहिले मानकरी

**छत्रपती संभाजीनगर:** – शब्दवेध बुक हाऊस प्रकाशन संस्थेच्या वतीने जनसंपर्क तज्ज्ञ प्रा. सुरेशजी पुरी यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त, “जनसंपर्कतज्ज्ञ : प्रा. सुरेशजी पुरी लोकपत्रकारिता’ पुरस्काराची आज घोषणा करण्यात आली. या पुरस्काराचे मानकरी म्हणून ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते अमर हबीब, अंबाजोगाई यांची निवड करण्यात आली आहे.

संवेदनशील पालक, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, लोकोपयोगी व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाचे माजी प्रमुख प्रा. सुरेश पुरी सर हे संबंध देशभरात परिचित आहेत. त्यांनी आतापर्यंत शेकडो विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारले आहे. तेच विद्यार्थी आणि लाभार्थी समाजाच्या




वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची कृतज्ञता म्हणून शब्दवेध बुक हाऊस या प्रकाशन संस्थेच्या वतीने या वर्षापासून सदर पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे.

ज्येष्ठ पत्रकार अमर हबीब हे दैनिक मराठवाडाच्या लातुर आवृत्तीचे संपादक होते. ते शेतकरी संघटनेतील सक्रिय कार्यकर्ते असून त्यांनी शेतकरी आत्महत्या संदर्भात लेखनासह कृतीशील उपक्रमही राबवले आहेत. त्यांनी सामाजिक चळवळीच्या अनुषंगाने अनेक पुस्तकेही लिहिली आहेत.त्यात ङ्गनाते, कलमा, संवाद, आकलन, शेतकरी विरोधी कायदेफसह दहा पुस्तके त्यांची प्रकाशित झाले आहेत. “शेतकरी विरोधी कायदे’ या ग्रंथाचा वेगवेगळ्या भाषेत अनुवादही झाला आहे. ते सध्या आंतरभारती मासिकाचे संपादक आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन अमर हबीब यांची निवड केल्याचे प्रकाशक वैजनाथ वाघमारे यांनी सांगितले.

जनसंपर्क विषय विद्यापीठात शिकविताना प्रा. पुरी सरांनी लोकसंपर्कच अधिक ठेवला. ते कधीच रूबाबदार प्राध्यापक न होता, जबाबदार पालक झाले. त्यामुळे त्यांचे शेकडो विद्यार्थी देशाच्या विविध क्षेत्रात कार्यरत असले तरी प्रा. पुरी यांच्याबद्दल अत्यंत कृतज्ञशील आहेत. प्रा. पुरी यांचे “जनसंपर्क : संकल्पना आणि सिद्धांत’ हा ग्रंथ खूप लोकप्रिय ठरला. तो विद्यापीठीय विद्यार्थ्यांसह सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्यांसाठी अत्यंत उपयोगी म्हणूनच त्या ग्रंथाकडे पाहिले जाते. हाच ग्रंथ हिंदीतही प्रकाशित झाला असून “महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी’चा बाबुराव विष्णू पराडकर पुरस्कारही या ग्रंथाला मिळाला आहे. सन २०१० साली प्रा. पुरी यांच्यावर ज्येष्ठ पत्रकार महारूद्र मंगनाळे यांनी “आई मनाचा माणूस’ हा ग्रंथ संपादित केला असून लातुरच्या मुक्तरंग प्रकाशनाच्या वतीने प्रकाशित करण्यात आला आहे. या ग्रंथाच्या दोन आवृत्त्या निघाल्या आहेत.

अकरा हजार रुपये रोख रक्कम, मानचिन्ह असं या पुरस्काराचे स्वरूप आहे. सदर कार्यक्रम दिनांक १८ मे २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता मौलाना आझाद संशोधन केंद्र, मजनु हिल येथे संपन्न होणार आहे. पुरस्काराचे पहिलंच वर्ष असून यापुढेही लोकपत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान करताना या पुरस्काराचे मूल्य जपण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न राहील, असे वाघमारे यांनी सांगितले. यावेळी पत्रकार परिषदेला प्रभाकर अर्सूड, डॉ. संजय गायकवाड उपस्थित होते.

# अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे त्वरीत पंचनामे करा-आमदार अग्रवाल

**गोंदियाः–** गोंदिया तालुक्यात गेल्या तीन चार दिवसात झालेल्या गारपीट, अवकाळी पावसामुळे व वादळी वाऱ्यांमुळे अनेक घरांचे, शेतांचे व पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने आमदार विनोद अग्रवाल यांनी मतदारसंघातील नुकसानग्रस्त भागातील शेत व घरांची पाहणी करीत स्वतः गावागावात जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला आणि पीडित नागरिकांशी थेट संवाद साधला.त्यांनतर तालुका प्रशासकीय यंत्रणेला या नैसर्गिक आपत्तीतून झालेल्या नुकसानीचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी आमदारांनी तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांना त्वरित संयुक्त पंचनामे सुरू करण्याचे निर्देश दिले. त्यांनी शेतकऱ्यांशी



प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

या दौऱ्यात आमदार अग्रवाल यांच्यासोबत उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत, जिल्हा कृषी अधिकारी निलेश कानवडे, तहसीलदार गोंदिया ग्रामीण समशेर पठाण, गटविकास अधिकारी आनंद पिंगळे, गोंदिया पंचायत समितीचे सभापती मुनेश रहांगडाले, जिल्हा परिषद कृषी व पशुसंवर्धन सभापती दीपताई चंद्रिकापुरे, तालुका कृषी अधिकारी नेहा आढाव तसेच संबंधित गावांचे तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

## संपादकीय

# जातनिहाय जनगणना : केंद्राचा क्रांतिकारी निर्णय

जातनिहाय जनगणना करण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने घेतलेला दुरगामी परिणाम करणारा निर्णय म्हणावा लागेल. १९३१ नंतर प्रथमच अशी जनगणना होणार असल्याने हा क्रांतिकारक निर्णय मानला जातो. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीने विशेषत: उत्तर प्रदेश, बिहार या मकाऊ बेल्टफ हिंदी पट्ट्यात जातनिहाय जनगणना करण्याचा मुद्दा उचलून, सत्ताधारी एनडीए सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांच्या प्रयत्नाला फारसे यश मिळाले नाही. तरीही, समाजातील एक उपेक्षित वर्गाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांची गणना होणे गरजेचे आहे, ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे आता विरोधकांची बोलती बंद झाली आहे. खरं तर काँग्रेसने त्यांच्या सत्ताकाळात हा निर्णय घेण्याची हिंमत दाखवली नव्हती. काँग्रेस सरकारने जातनिहाय जनगणनेचा विरोध केला आहे. त्यामुळेच, १९४७ पासून देशात जातनिहाय जनगणना करण्यात आली नाही. जात जनगणना करण्याऐवजी जात सर्वेक्षण करण्यात आले. त्यामुळे राहुल गांधींना यावर टीका करण्याचा अधिकार पोहोचत नाही; परंतु समाजातील विशिष्ट समूहांना आपल्याकडे ओढण्यासाठी राहुल गांधी यांच्या काँग्रेस पक्षाने जातनिहाय जनगणनेचा मुद्दा गेल्या काही महिन्यांत उचलून धरला होता. मदुसऱ्यास शिकवतो ज्ञान, आपण मात्र कोरडे पाषाणफया म्हणी प्रमाणे राहुल गांधींच्या काँग्रेसची अवस्था आहे. मजिसकी जितनी संख्या, उसकी उतनी भागीदारी होगी,फ असे प्रचार सभेतून बोलणाऱ्या राहुल गांधी यांनी दलित, आदिवासी, ओबीसी वर्गातील किती टक्के पदाधिकाऱ्यांना पक्षाची महत्त्वाची पदे दिली, हे जाहीर करावे. त्यामुळे मोदी सरकारने उचलेल्या या भूमिकेमुळे विरोधकांच्या हातातील मुद्दा निकामी झाला आहे.

दर दहा वर्षांनी जनगणना कार्यक्रम केला जातो. २०११ नंतर जनगणना झाली होती. त्यामुळे जनगणनेत यंदा जातनिहाय गणना समाविष्ट करण्यात आली आहे. देशातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय अशा विविध घटकांचे प्रमाण किती याची निश्चित आकडेवारी समजण्यासाठी ही जातनिहाय जनगणना उपयुक्त ठरणार आहे. शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये असलेल्या आरक्षणाचे प्रमाण लोकसंख्येच्या तुलनेत कमी असल्याच्या नेहमीच्या तक्रारी आहेत. निश्चित आकडेवारी उपलब्ध नसल्याने प्रत्येक समाज घटकांची प्रत्यक्ष लोकसंख्या किती याची अधिकृतपणे आकडेवारी सरकारकडे उपलब्ध नसल्याने जातनिहाय जनगणनेची मागणी पुढे आली होती.

इंद्रा सहानी विरुद्ध भारत सरकार या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणासाठी ५० टक्क्यांची मर्यादा घातली होती. बहुतेक राज्यांनी ही मर्यादा ओलांडली. ५० टक्क्यांची ही मर्यादा शिथिल करावी, अशी मागणी सर्वच राजकीय पक्षांकडून केली गेली. जातनिहाय जनगणनेची आकडेवारी प्रसिद्ध झाल्यावर लोकसंख्येच्या आधारे ही मर्यादा शिथिल करणे शक्य होईल, असे राजकीय नेत्यांना वाटते आहे. तसे पाहायला गेले, तर २०११च्या जनगणनेबरोबरच जातनिहाय जनगणना करावी, अशी विविध राजकीय पक्षांनी मागणी केली होती. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारने सामाजिक-आर्थिक जातनिहाय जनगणना केली होती. मात्र, ही गणना जनगणना कायद्यानुसार झाली नव्हती. या जनगणनेची अधिकृत आकडेवारी तांत्रिक चुकांचे कारण देत केव्हाच प्रसिद्ध करण्यात आली नाही. सामाजिक-आर्थिक जनणगनेत ४६ लाख ७३ हजारांच्या आसपास विविध जाती, उपजाती असल्याची आकडेवारी जमा झाली होती. पण यामध्ये सुमारे आठ कोटी चुका झाल्या होत्या. कोरोना काळामुळे २०२१ मध्ये जनगणना झाली नव्हती.

कर्नाटक सरकारने २०१५ मध्ये जातनिहाय जनगणना केली होती. त्यानंतर बिहार, तेलंगणा, आंध्र प्रदेश या राज्यांनी जातनिहाय जनगणना केली होती. विविध राज्यांनी जातनिहाय जनगणना केली तेव्हा दरवेळी केंद्र सरकारने राज्यांच्या जातनिहाय जनगणनेला विरोध केला होता. विशेष म्हणजे केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात जातनिहाय जनगणनेच्या विरोधात भूमिका मांडली होती. जनगणना करण्याचा अधिकार हा फक्त केंद्र सरकारचा आहे, राज्यांना स्वतंत्रपणे जनगणना करता येत नाही, असा युक्तीवाद केंद्र सरकारने न्यायालयात मांडला होता. आता केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेतल्यामुळे, अनेक राज्यात जातीच्या आरक्षणामुळे निर्माण झालेले प्रश्न निकाली लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, त्यासाठी केंद्र सरकारला एकूण ५० टक्के आरक्षणाची अट शिथिल करून ती वाढवावी लागणार आहे.

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २४६ नुसार, जनगणना ही सातव्या अनुसूचीतील संघ सूचीमध्ये ६९ व्या स्थानावर सूचीबद्ध असलेला केंद्र सरकारच्या अधिकारक्षेत्रातील विषय आहे. काही राज्यांनी जातींची गणना करण्यासाठी सर्वेक्षणे केली असली, तरी या सर्वेक्षणांमध्ये पारदर्शकता आणि हेतूमध्ये भिन्नता आहे, काही सर्वेक्षणे केवळ राजकीय दृष्टिकोनातून केली गेली आहेत, ज्यामुळे समाजात शंका निर्माण झाल्या आहेत. या सर्व परिस्थितींचा विचार करून आणि आपल्या सामाजिक रचनेवर राजकीय दबाव येऊ नये, यासाठी जातनिहाय गणना स्वतंत्र सर्वेक्षण म्हणून करण्याऐवजी मुख्य जनगणनेतच समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे सर्व समाजघटकांना त्यांचा न्याय्य हक्क मिळण्यास मदत होणार आहे. सामाजिकदृष्ट्या दुर्बल, वंचित, उपेक्षित समाजबांधवांच्या विकासासाठी सरकारला अधिक निधी देता येईल. मागास समाजघटकांचा शैक्षणिक, आर्थिकस्तर उंचावण्यास मदत होऊन सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे ध्येय वेगाने साध्य करता येईल. जातनिहाय जनगणनेचा निर्णय म्हणजे सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दिशेने केंद्र सरकारने टाकलेले महत्त्वपूर्ण, क्रांतीकारी पाऊल म्हणावे लागेल.

# नागपूर विभागात गोंदिया जिल्हा अव्वल

## जिल्ह्याचा निकाल ९४.०४ टक्के; सावित्रीच्या लेकीच समोर



अपूर्वा बिसेन
९६.३३ टक्के
विज्ञान शाखा



हरक्रिपाकौर भाटिया
९७.८९ टक्के
वाणिज्य शाखा



संस्कृती भेंडारकर
९२.३३ टक्के
कला शाखा

गोंदिया:- महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावी परीक्षेचा निकाल सोमवारी (दि. ५) जाहीर करण्यात आला, यात जिल्ह्याचा एकूण निकाल ९४.०२ टक्के लागला असून गोंदिया जिल्हा नागपूर विभागात अव्वल ठरला आहे.

अर्जुनी मोरगाव येथील सरस्वती कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी अपूर्वा टोपेशकुमार बिसेन हिने ९६.३३ टक्के गुण विज्ञान शाखेत जिल्ह्यात अव्वल क्रमांक प्राप्त केला. तर गोंदिया येथील गुजराती नॅशनल स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी हरक्रिपाकौर भाटिया हिने ९७.८९ टक्के गुण प्राप्त करून वाणिज्य शाखेत अव्वल ठरली. तर गोंदिया येथील एस. एस. गर्ल्स कॉलेजची विद्यार्थिनी संस्कृती महेश भेंडारकर हिने ९२. ३३ टक्के गुण प्राप्त करून कला शाखेत अव्वल क्रमांक प्राप्त केला. त्यामुळे बारावीच्या निकालात मुलीच सरस ठरल्या.

बारावीच्या निकालात दरवर्षीप्रमाणे अर्जुनी मोरगाव येथील सरस्वती कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली. विशेष बारावी विज्ञान शाखेत याच विद्यालयाचे तीन विद्यार्थी प्रथम, द्वितीय आणि तृतीय आले आहेत. यात अपूर्वा बिसेन २६.३३. ऋषभगजानन गभने ९६.१७, सुमित तुलाराम ढोमणे ९५.६७ टक्के गुण प्राप्त केले आहे. तर वाणिज्य शाखेतून गोंदिया येथील गुजराती नॅशनल हायस्कूल व कनिष्ठ विद्यालयाची विद्यार्थिनी हरक्रियाकौर भाटीया ९७.८९ टक्के प्रथम, नमाद महाविद्यालयाचा आर्यन गेडाम ९७.५० टक्के द्वितीय व विवेक मंदिर विद्यालयाची प्रियांशी हेमंत अग्रवाल हिने ९६.८३ टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकाविला.

कला शाखेत एस. एस. गर्ल्स महाविद्यालयाची संस्कृती महेश भंडारकर हिने ९२.३३ टक्के गुण प्राप्त करून जिल्ह्यात प्रथम, तर सरस्वती कनिष्ठ विद्यालयाची रांची भीमराव लांडगे ९२.१७ टक्के गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक पटकाविला. गतवर्षीची परंपरा कायम राखत मुली यंदाही टक्केवारीत समोर आहेत. जिल्ह्याचा निकाल ९४.०४ टक्के इतका आहे. मुलांच्या निकालाची टक्केवारी ९१.७७ इतकी असून, मुलींच्या निकालाची टक्केवारी ९६.४४ टक्के इतकी आहे.

जिल्ह्यात एकूण १७ हजार ९८९ विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेकरिता नोंदणी केली होती. यापैकी १७ हजार ९०८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यात एकूण १६ हजार ८४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. परीक्षेला एकूण नऊ हजार २१४ विद्यार्थी, तर आठ हजार ६९४ विद्यार्थिनी बसल्या होत्या. यापैकी आठ हजार ४५६ विद्यार्थी आणि आठ हजार ३८५ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. विद्यार्थ्यांची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ९१.७७, तर विद्यार्थिनींची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ९६.४४ इतकी आहे. गेल्यावर्षीप्रमाणे यंदाही मुलीच समोर राहिल्या. जिल्ह्यात तिरोडा तालुका टॉप ठरला असून, या तालुक्याचा एकूण निकाल ९७.२१ टक्के आहे, तर सडक अर्जुनी तालुक्याचा सर्वाधिक कमी म्हणजेच ८६.५१ टक्के इतका निकाल आहे.

### तालुकानिहाय निकाल... (आकडे टक्केवारीत)

| | |
|---|---|
| गोंदिया : | ९४.४२ |
| आमगाव : | ९२.०९ |
| अर्जुनी मोरगाव : | ९६.९८ |
| देवरी : | ९३.८८ |
| गोरेगाव : | ९१.६० |
| सडक अर्जुनी : | ८६.५१ |
| सालेकसा : | ९५.६१ |
| तिरोडा : | ९७.२१ |

### सरस्वती कनिष्ठ महाविद्यालयाची अपूर्वा बिसेन प्रथम

अर्जुनी मोरगाव: येथील सरस्वती कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी अपूर्वा टोपेशकुमार बिसेन हिने ९६.३३ टक्के गुण घेऊन विज्ञान शाखेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे, तर याच महाविद्यलयातील ऋषभ गजानन गभणे याने ९६.१७ टक्के आणि सुमीत तुलाराम हेमणे याने ९५.६७ टक्के गुण मिळवत द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

यश भुवनेश्वर शहारे याने ९२.५० टक्के, क्रिश गणेश दृगकर याने ९२.५० टक्के, कृणाल शहाजी बोरकर याने ९१.३३ टक्के गुण मिळिवले आहे. महाविद्यालयातील विज्ञान शाखेतून एकूण १४८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यापैकी ४४ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत व ८६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. १८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. कला शाखेतून एकूण ५९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ९ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत, १९ विद्यार्थी प्रथम, तर ३१ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

### गर्ल्स महाविद्यालयाच्या संस्कृतीला कला शाखेत ९२.३३ टक्के

गोंदिया : येथील एस. एस. गर्ल्स महाविद्यालयाचा इयत्ता बारावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे. या महाविद्यालयाची विद्यार्थिनी संस्कृती महेश भेंडारकर हिने ९२.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. ज्योती नरेश बोकडे हिने ८१ टक्के, गुंजण रवींद्र काठेवारने ८०.१७ टक्के गुण मिळिवले. त्याचप्रमाणे विज्ञान शाखेतील तनुश्री कपाट हिने ७९.१७ टक्के, तानिया उके हिने ७६.५० टक्के, ईशा भेंडारकर हिने ७४.८३ टक्के गुण मिळिवले. तसेच कला शाखेतील इशिका पियूष तिवारी याने ७७.८३ टक्के, दिशा जितेश उजवणे हिने ७७.५० टक्के, निलाक्षी रोशन हिरापुरे हिने ७६.३३ टक्के गुण मिळिवले. या सर्व विद्यार्थ्यांचा प्राचार्या डॉ. शारदा महाजन यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.



### पुराडा येथील आश्रम शाळेची श्रुती मरकाम तालुक्यात प्रथम



देवरी : तालुक्याच्या पुराडा येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेची विद्यार्थिनी श्रुती लक्ष्मीशंकर मरकाम हिने बारावीच्या परीक्षेत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. श्रुतीने ८३.३३ टक्के गुण मिळवून विज्ञान शाखेत तालुक्यातून प्रथम येण्याचा मान पटकावला. श्रुती दहावीच्या परीक्षेतसुद्धा तालुक्यातून प्रथम आली होती, हे विशेष. श्रुतीने यशाचे श्रेय आईवडील, प्राचार्य कमल कापसे व शिक्षकांना दिले आहे. तिच्या यशाबद्दल आमदार संजय पुराम, जिल्हा परिषद सदस्या सविता पुराम, प्रकल्प अधिकारी उमेश काशिद, सहायक प्रकल्प अधिकारी सायली चिखलीकर, शिरीष सोनेवाने, सुनील भुसारी, कपिल शर्मा, एस. के. बन्सोड तसेच शिक्षकांनी तिचे अभिनंदन केले आहे.

# घरकुल योजना पुर्वीप्रमाणेच सुरु ठेवण्यात याव्या-परशुरामकर



**सडक अर्जुनी :** - मागील अनेक वर्षापासून आदिवासी लोकांसाठी शबरी, मागासवर्गीयांसाठी रमाई, विमुक्त भटक्या जाती साठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत आणि २ वर्ष पुर्वी ओबीसी साठी सुरू केलेली मोदी आवास योजना या सर्व योजनांसाठी वर्षभराचे बांधकामाचे उद्दिष्ट ठरवून दिलेले असते. मात्र मार्च महिना संपून मे महिना उजाडला तरी अजून पर्यंत जिल्ह्यांना उद्दिष्ट न आल्याने या योजना बंद होण्याचे मार्गावर आहेत काय? असा प्रश्न सर्वत्र विचारला जात आहे.

शासनाने विविध प्रवर्गासाठी सुरू केलेल्या या योजना पूर्ववत सुरू ठेवाव्या अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाधर परशुरामकर यांनी केली आहे. केंद्र शासनाने इंदिरा आवास योजनेचे नाव बदलून आता प्रधानमंत्री आवास योजना केली आहे. ही योजना इंदिरा गांधी प्रधानमंत्री असताना सुरू करण्यात आली होती. कालांतराने त्यात बदल होत गेले त्याचे नाव आता मोदी सरकारनी प्रधान मंत्री आवास योजना असे केले आहे. ही योजना सुरू असतानाच मागास प्रवर्गातील लोकासाठी रमाई घरकुल योजना, आदिवासी साठी शबरी घरकुल योजना, वविमुक्त भटक्या जाती साठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत या योजना कार्यान्वित होत्या. या सर्व योजनेत काही हिस्सा राज्य शासनाचा व काही हिस्सा हा केंद्र शासनाचा होता. शासनाचे आदेशा नुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला तिन वर्षासाठी उद्दिष्ट ठरवून दिले. प्रत्येक ग्रामपंचायतने ग्राम सभा घेवून याद्या मंजुर करून घेतल्या. मागील वर्षी त्याचा लाभ देण्यात आला.

२४-२५ या वर्षासाठी ३ लाख घरकुल, २५-२६ या वर्षासाठी ४ लाख घरकुल असे एकूण तिन वर्षात १० लाख घरकुल बांधकामाचा शासन निर्णय काढला. यासाठी २३-२४ या वर्षासाठी ३ हजार ६०० कोटी रूपये २४-२५ साठी ३ हजार ६०० कोटी रूपये, तर २५-२६ या वर्षासाठी ४ हजार ८०० कोटी रूपये, असे एकूण १२०० कोटी रूपये शासन या योजने वर खर्च करणार होते. पण ही योजना फक्त एकच साल चालविण्यात आली. आता या योजनेवर कुणीही बोलायला तयार नाही. या योजनेत गोवारी समाजाचाही समावेश करण्यात आला होता.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते युवा पुरस्काराचे वितरण



**गोंदिया :-** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा धोरणानुसार जिल्ह्यातील युवक-युवती व संस्थानी केलेल्या समाज हिताच्या कार्याचा गौरव करण्यासाठी शासनाकडून जिल्हा युवा पुरस्कार देण्यात येतो. सन २०२१-२२ ते २०२४-२५ या वर्षांमधील गोंदिया जिल्ह्याचा युवा पुरस्कार जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी भय्यासाहेब बेहेरे, जिल्हा क्रीडाधिकारी नंदा खुरपुडे, तालुका क्रीडाधिकारी ए. बी. मरस्कोल्हे, रवींद्र वाळके, ओमकांता रंगारी उपस्थित होते.

जिल्हास्तर युवा पुरस्कार (युवक) करिता गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम १० हजार असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सन २०२१-२२ या वर्षाचा जिल्हा युवा पुरस्कार आमगाव तालुक्यातील ग्राम किडंगीपार येथील रविकांत रूपलाल पाऊलझगडे, सन २०२३-२४ या वर्षाचा विनेश राधेश्याम फुंडे, सन २०२४-२५ या वर्षाचा तिरोडा येथील अमन हंसराज नंदेश्वर यांना देण्यात आला. तसेच सन २०२१-२२ मधील नवजीवन ग्रामीण विकास संस्था रामजीटोला आमगाव, सन २०२३-२४ या वर्षाचा शिवछत्रपती बहुउद्देशीय विकास संस्था गोंदिया तर २०२४-२५ या वर्षाचा डीजीएम तायक्वांदो स्पोर्ट्स एज्युकेशन अॅण्ड युथ अकादमी वांढराला देण्यात आला. जिल्हा क्रीडा पुरस्कारात वैयक्तिक सन २०२१-२२ या वर्षाचा पुरस्कार १० हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र तिरोडा तालुक्यातील ग्राम चुरडी येथील अंकिता अशोक सपाटे हिला प्रदान करण्यात आला. संचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी केले.

# सेवा सहकारी संस्थांना नफ्यात आणा-संचालक रेखलाल टेंभरे



**गोरेगाव:-** मांडोदेवी देवस्थान येथे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थाची बैठक आयोजित करण्यात आली होती.या सभेत सेवा सहकारी संस्थाना नफ्यात आण्याकरीता सर्वांनी प्रयत्न करावे तसेच जिल्हा बँकेत संस्थांचे असलेले अधिकार मिळावे अशी भूमिका गोंदिया जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक रेखलाल टेंभरे यांनी मांडली.

सभेला को-ऑप. बँकेचे संचालक रेखलाल टेंभरे,विविध कार्य.सेवा सहकारी संस्था संघटना जिल्हा अध्यक्ष डोमा बोपचे,खरेदी विक्रीचे अध्यक्ष जगदिश येरोलो,केवलभाऊ बघेले,विजय राणे,गोदिया तालुकाअध्यक्ष लखन मेंढे, दुर्गाप्रसाद ठाकरे, तिरोडा अध्यक्ष विलास मेश्राम, हंसराज रहांगडाले, गोरेगाव ता.अध्यक्ष किशोर ठाकरे,ओम पटले, पुनेश बोपचे, वेकंट कटरे, योगराज पारधी, पन्नालाल बोपचे आणि तालुका अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थि होते.सभेचे संचालन डॉ योगश हरिनखेडे यांनी केले सभेची प्रस्तावना मोरगाव अर्जनीचे तालुका अध्यक्ष ललीत बाळबुद्धे यांनी केली.सभेचे व्यवस्थापन उपाध्यक्ष शंकर पटले यानी केले.आभार प्यारेलाल गौतम यानी मानले.

# जात जनगणना:सामाजिक न्याय आंदोलनाचा प्रभाव!

आधीच देशातली जातीयता नष्ट होत नाहीये. त्यात ही जातगणनेची घोषणा. मा. पंतप्रधान, भारतीय जनता पक्षाचे अनेक नेते उच्चरवाने जाती आधारीत जनगणनेला अनेक वर्षे विरोध करत होते. मग हे जातगणनेचं अचानक काय यांच्या डोक्यात शिरलंय? देशात पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्याच्या संदर्भात, सरकार काय पावले उचलणार? पाकिस्तानला कसा धडा शिकवणार? या प्रश्नांच्या उत्तरांची अपेक्षा असताना हे काय भलतंच, अशा भावना अनेक देशवासियांच्या मनात निर्माण झाल्या आहेत. मोदींचे भक्तही सैरभैर झालेत. "मोदी करेसो कायदा', हे भक्तांच्या डोक्यात ठासून भरलेले असल्यामुळे, मोदींच्या या घोषणेचा विरोध तर करता येत नाहीये. गेली अनेक वर्षे जातगणनेचा विरोध करत आलो असताना आता अचानक त्याच्या समर्थनार्थ बोलणार तरी कसं, हा गुंताही त्यांच्याने सुटत नाहीये. थोडक्यात पाकिस्तानवरचा हल्ला वा किमान सर्जिकल स्ट्राईक सरकार कधी करायचे ठरवेल ते ठरवो, सध्यातरी भक्तांवरच सर्जिकल स्ट्राईक झाल्याचं जाणवतंय!

नोटाबंदीचा निर्णय असो वा करोना काळातील लॉकडाऊनचा निर्णय असो, जनतेच्या जगण्यावर विशेष परिणाम करू शकतात असे निर्णय कुणाच्या ध्यानी-मनी नसताना अचानक जाहीर करणे ही मोदींची खासियत राहीली आहे. मात्र यावेळी या सगळ्या नाटकीय जाहिरातबाजीला, इतरही काही पदर आहेत. पहलगाम अतिरेकी हल्ल्याची निघृण व निंदनीय घटना घडताच, पुलवामाच्या वेळेप्रमाणे आपले शूटिंग व जाहीर सभा यात दंग राहणाऱ्या मा. पंतप्रधानांनी, यावेळी आपला परदेश दौरा अर्धवट सोडून देशाकडे धाव घेतली. देशाचे गृहमंत्री लागलीच जम्मू काश्मीरला धावले. सर्व राजकीय पक्षांना विश्वासात घेण्यासाठी लगोलग सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली. त्यामुळे भारत सरकार पाकिस्तानशी अगदी लागलीच युद्ध छेडो न छेडो, किमान खऱ्या अर्थाने युद्धपातळीवर या हल्ल्याच्या मुळाशी जाण्याचे, त्यासाठी इतर सर्व बाबी बाजूला ठेवत सर्व लक्ष अतिरेकी हल्ल्यासंदर्भातील विचार-विनिमय आणि त्यानुरूप कृतीवर केंद्रीत करेल; अशी सहाजिक अपेक्षा होती. प्रत्यक्षात सरकारची पावले वेगळ्याच दिशेने पडू लागल्याचे जाणवते आहे.

अतिरेकी हल्ला होवो, करोंनाच्या संकटात जनता अक्षरश: होरपळो किंवा अन्य काही संकट समोर येवो. त्याची दखल तर घ्यावी लागणारच त्यामुळे ती घेवू. मात्र आपल्या मूळ अजेंडावरून आपले लक्ष विचलित होवू द्यायचे नाही, ही भाजपाची बहु परिचित आणि वारंवार अनुभवास येणारी कार्यपद्धती राहिलेली आहे. वर्षाचे बारा महीने, ३६५ दिवस, आणि दिवसाचे २४ तास भाजपा इलेक्शन मोडवर असते. सत्ता सांभाळण्यासाठी वा कसेबसे सत्तेवर चढण्यासाठी भाजपाला जरी अन्य पक्षांसोबत आघाडी करावी लागत असली तरी येनकेन प्रकारेण, "शत प्रतिशत भाजप', हे त्यांचे लक्ष्यही त्यांच्या नेत्यांच्या कायम डोक्यात असते. त्यामुळे बिहार निवडणुकीच्या तोंडावर हे हल्ल्याचे आरीष्ट आले असले तरी त्याचाही निवडणुकीसाठी कसा फायदा करून घेता येईल, ही त्यांची एक रणनीती. आणि त्याचाच पुढचा भाग म्हणजे या हल्ल्याने विचलित न होता, लवकरच येवू घातलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीची जी



तयारी सुरू आहे ती तशीच सुरू ठेवायची, ही दुसरी.

अगदी स्वातंत्र्यापासूनचा इतिहास तपासला तर, "संसोपा (संयुक्त सोशलिस्ट पार्टी)ने बांधी गांठ, पिछडा पावे सौमें सांठ' ही घोषणा जेष्ठ समाजवादी चिंतक आणि नेते डॉ. राम मनोहर लोहियांनी १९६० च्या दशकात प्रथम दिली. समाजवाद्यांनी ती लावून धरली. त्यातूनच पुढे कालेलकर आयोग, मंडल आयोग आले. व्ही.पी. सिंगाच्या सरकारने मंडल आयोग लागू करून इतर मागास वर्गीयांना प्रथमच सवलती जाहीर केल्या. भाजपाने सरकारचा पाठींबा काढून घेत, हिंसक हिंदुत्वाची लाईन घेऊन रथयात्रा काढली. आणि त्यातूनच पुढे सांप्रदायिक दंगे आणि धर्माच्या आधारे समाजाचे विभाजन करणाऱ्या बाबरी मशिदीचा विध्वंस साऱ्या जगाने अनुभवला. अलीकडच्या काळात जात जनगणनेचा मुद्दा सममाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, राजदचे तेजस्वी यादव हेही मांडत असले तरी याला खरी धार मिळवून दिली ती विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी. सत्ताधारी या नात्याने सरकारच्या घोषणेचे श्रेय भाजपा लाटत असले तरी याचे सगळे श्रेय राहुल गांधी यांना, त्यामुळेच मिळते.

अर्थात, आज संघ प्रमुख मोहन भागवत पंतप्रधानांना भेटतात आणि उद्या सरकार जात जनगणना घोषित करते याचा एक अर्थ हाही आहे की संघ-भाजपाच्या हे पक्के लक्षात आलेले आहे की, बिहार निवडणुकीत विरोधक जात जनगणनेचा मुद्दा तापवणार आणि त्याला जनतेचा प्रतिसाद मिळणार. त्यामुळे विरोधकांच्या या मुद्द्यावरील प्रचाराची हवा काढून घेण्याचा गेमप्लानही यापाठी असू शकतो. भाजपा जात जनगणनेच्या अगदी प्रथमपासून ठाम विरोधी आहे. हिंदू खतरे में है, बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है, असे नारे देत भाजपा एका बाजूला जातीत वाटल्या गेलेल्या हिंदूंना गोंजारायचा प्रयत्न करत असते तर दुसरीकडे, मुस्लिम, ख्रिश्चन, दलित आदींबाबत जन सामान्यांमध्ये वैरभाव निर्माण करण्याचे प्रयत्न करीत असते. त्यामुळे जातवार जनगणना हिंदू एकजुटीच्या ढोंगाला सुरुंग लावेल, हे भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला चांगलेच ठाऊक आहे. "सब हिंदू एक' असा भ्रम पसरवत, हिंदूंमधील जाती-जातीत शिक्षण, व्यवसाय, अधिकार पदे, आर्थिक सुबत्ता या सर्व आघाड्यांवर जी प्रचंड विषमता आहे, ती झाकण्याचा संघ-भाजपाचा डाव जात-वार जनगणना व्यवस्थितपणे केली तर आकडेवारीसह किंवा पुराव्यानिशी उघडा पडेल. असे झाल्यावर तथाकथित हिंदुत्ववादी लाईन मतदारांच्या पचनी पडणे अवघड बनेल. हे धोके संघ-भाजपाला पक्के ठावूक आहेत. त्यामुळेच जातीवर सवलती, किंवा जातीय विषमतेच्या आधारावर मागासवर्गीयांना विशेष संधी देण्याचे या देशात जेंव्हा जेंव्हा प्रयत्न झाले, तेंव्हा तेंव्हा संघ-जनसंघ-भाजपाने त्याचा विरोध केला आहे. विरोध केवळ शाब्दिक वा प्रतिकात्मक नाही तर सत्तेवर असलेली सरकारे पाडण्याची कामे संघ-भाजपाने केलेली आहेत. अगदी अलिकडच्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळीही भाजपाने जात जनगणनेची मागणी करणारे काँग्रेस, समाजवादी, राष्ट्रीय जनता दल आदी पक्ष फुटीरतावादी असल्याचा जहाल प्रचार केलेला आहे.

शेतकऱ्यांच्या अभूतपूर्व आंदोलनासमोर आपणच लादलेले तीन कायदे सरकारला मागे घ्यावे लागले. सर्वोच्च न्यायालयाच्या फटकारानंतर वक्फ बाबतही सरकारला माघार घ्यावी लागली. याचा अर्थ सरकारने सारे मनापासून स्वीकारले असे होत नाही. शेतकऱ्यांना पुन्हा गुंडाळण्याचा प्रयत्न सुरूच आहे. तसेच जात जनगणनेबाबतही सरकार करु शकते. याचे मुख्य कारण म्हणजे, एकदा व्यवस्थित आणि संपूर्ण जात जनगणना पार पडली की प्रश्न तिथेच संपणार नाही. उलट मागासवर्गीयांच्या सद्य स्थिती बाबतची, त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची, त्यांच्या शोषणाची सगळी गाथा असलेला पेटाराच उघडला जाणार आहे. एखाद्या मागास जातीचे जे प्रमाण लोकसंख्येत आहे, त्या प्रमाणात त्यांची सवलती मिळवण्याची लढाई सुरू होईल. सरकारला राखीव जागांवर असलेले ५० % चे बंधन हटवावे लागेल. थोडक्यात, सध्याच्या विषारी सांप्रदायिक राजकारणाच्या जागी सामाजिक न्यायाचे राजकारण प्रभावी बनेल.

संजय मंगला गोपाळ
"जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वया'च्या राष्ट्रीय कार्यगटाचे सदस्य व "भारत जोडो अभियान'चे राज्य समन्वयक व राष्ट्रीय सचिव.
sansahil@gmail.com

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# पदोन्नती नाकारलेल्या कर्मचाऱ्यांचा पुन्हा पदोन्नती यादीत समावेश



**अर्जुनी मोरगाव :–** जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांनी प्राथमिक शिक्षक संवर्गातून उच्च श्रेणी मुख्याध्यापक पदावर पदोन्नती देण्याची सेवा जेष्ठता यादी नुकतीच प्रसिद्ध केली आहे. त्यात मागील काळात पदोन्नतीस नकार देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा, पुनश्च पदोन्नती यादीमध्ये समावेश करून शासन आदेशाची पायमल्ली केली जात आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने पदोन्नती नाकारल्यामुळे उद्भवणारे परिणाम व त्याबाबत अवलंबजावणीची कार्यवाही याबाबत शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१५ प्र.क.३०३/का.१२, १२/०९/२०१६ या शासन निर्णयाद्वारे स्पष्ट केलेले आहे. वरच्या संवर्गात पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर अथवा तत्पूर्वीच एखाद्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे पद स्वीकारण्यास नकार दर्शविल्यास, त्यांचे नाव पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या निवड यादीतून काढून टाकण्यात यावे. पुढील वर्षी होणाऱ्या निवडसूचीमध्ये संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांच्या नावाचा विचार न करता, तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचित संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांची पदोन्नती साठीची पात्रता तपासण्यात यावी. त्यावेळच्या गुणवत्तेप्रमाणे सबंधित अधिकारी कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र ठरल्यास, त्याचा नियमित निवड सूचीत समावेश करण्यात यावा.

ज्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी कायमस्वरूपी पदोन्नती नाकारलेली आहे, त्यांचा पुढील कोणत्याही निवड सूचीत विचार करण्यात येऊ नये. ज्या अधिकारी, कर्मचारी यांची पहिल्या वेळेस पदोन्नती नाकारल्यानंतर ३ वर्षानंतर दुसऱ्या वेळेस, निवड सूचीकरिता विचार करण्यात आल्यानंतर व संबंधित अधिकारी कर्मचारी पदोन्नतीस पात्र ठरल्यास मात्र संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांनी पुन्हा पदोन्नतीस नकार दिला असल्यास त्याच्या पुढील २ वर्षाच्या निवडसूचीत विचार करण्यात येणार नाही. याप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश आहेत.

## शासकीय आदेशाचे केली जात आहे पायमल्ली

**मागील काळात उच्चश्रेणी मुख्याध्यापकाचे पदोन्नतीने आदेश देताना सेवाज्येष्ठता यादी ८ जुलै १९९२ पर्यंत आलेली होती. अनेक वरिष्ठ शिक्षक कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीने जाण्यास नकार दिला होता. असे असतानाही नकार दिलेल्या कर्मचाऱ्यांचे पुनश्च, पदोन्नती यादीत समावेश करून, शासन निर्णयाची पायमल्ली करीत असल्याचे चित्र दिसत आहे.**

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी घ्यावी दखल

**शासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या पदोन्नती नाकारण्याच्या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी १२/०९/२०१६ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. या शासन आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून पदोन्नती नाकारलेल्या कर्मचारी अधिकाऱ्यांची नावे कमी करण्यात यावी तसेच सेवाज्येष्ठता यादी शासन निर्णयानुसार तयार करण्यात यावी, असा सूर शिक्षकांकडून आळवला जात आहे. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांनी या प्रकाराकडे लक्ष देण्याची मागणी केली जात आहे.**

# रेल्वेने दोन वर्षांपूर्वी ज्यांच्या झोपड्या पाडल्या त्यांना घरकूल मिळणार



**गोंदिया :–** शहरातील डॉ. आंबेडकर वॉर्ड रेल्वे लाइनलगत नगरपरिषदेच्या जागेवर गेल्या ३० वर्षांपासून झोपड्या बांधून राहत असलेल्या गरीब कुटुंबांच्या ३२ झोपड्या रेल्वे प्रशासनाने दोन वर्षांपूर्वी विकास कामांसाठी तोडल्या होत्या. त्यामुळे ३२ कुटुंब उघड्यावर राहण्याची वेळ आली होती. या ३२ कुटुंबांना आता शासनाच्या घरकुल योजनेंतर्गत घरकुल उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे आ. विनोद अग्रवाल यांनी सांगितले.

ही ३२ कुटुंबं आर्थिक दृष्ट्या कमकुवत असल्याने माजी नगरसेवक घनश्याम पानतवने यांनी १६ कुटुंबांसाठी दिले तर उर्वरित १६ कुटुंबांना अत्यंत कमी दरात प्लॉट उपलब्ध करून देण्यात आले. या प्लॉटवर घरकूल योजनेचा लाभमिळावा यासाठी या बेघर कुटुंबांनी एक वर्षापूर्वी अर्ज दाखल केले होते; पण काही कारणामुळे सर्व अर्ज रद्द करण्यात आले होते. याची माहिती आ. विनोद अग्रवाल यांना मिळताच त्यांनी शुक्रवारी (दि.२) या परिसराला भेट दिली. तसेच समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त विनोद मोहतुरे, अपर तहसीलदार श्रीकांत कांबळे यांना तिथे बोलावून त्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन बेघर कुटुंबांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

सर्व ३२ कुटुंबांना घरकूल योजनेचा लाभ लवकरच मिळवून देण्याचे आश्वासन दिले. तसेच या संबंधित आवश्यक कार्यवाही त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. यावेळी घनश्याम पानतवने, बंटी पंचबुद्धे, व सामाजिक कार्यकर्ते अमित भालेराव देखील उपस्थित होते.

# डाकपालाने केली १ लाख ६३ हजार रुपयांची अफरातफर

## तक्रारीनंतर गुन्हा दाखल : चार खातेधारकांची केली आहे फसवणूक

**गोंदिया :–** खातेदाराने जमा करण्यासाठी दिलेली रक्कम त्यांच्या खात्यात जमा न करणे, तसेच खातेदारांच्या बनावट स्वाक्षरी करून त्यांच्या खात्यातून पैसे विड्राल करून डाकपालाने १ लाख ६३ हजार अफरातफर घटना रुपयांची केल्याची तिरोडा तालुक्यातील ठाणेगाव येथील पोस्ट ऑफिसमध्ये उघडकीस आली. याप्रकरणी उपविभागीय डाक निरीक्षक यांच्या तक्रारीवरून आरोपी डाकपाल जयश्री ओमप्रकाश टेकाम, रा. बेरडीपार हिच्यावर तिरोडा पोलिस येथे शुक्रवारी (दि. २) फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

तक्रारीनुसार आरोपी जयश्री टेकाम या तिरोडा तालुक्यातील ठाणेगाव येथील पोस्ट ऑफिसमध्ये डाकपाल पदावर कार्यरत असताना, तिला खातेदार उषाबाई वासुदेव खोब्रागडे, रा. ठाणेगाव यांनी २६ जुलै २०२३ ला दहा हजार, १ ऑगस्टला २०२३ ला १५ हजार रुपये, २३ ऑगस्टला ५० हजार रुपये, २५ सप्टेंबरला पंधरा हजार रुपये आणि २५ सप्टेंबर २०२३ ला २० हजार रुपये ठाणेगाव शाखा पोस्ट ऑफिसला येऊन आपल्या बचत खाते क्रमांक ८९५७६४३७४३ मध्ये भरण्यासाठी जयश्री टेकाम हिला दिले होते. जयश्री टेकाम हिने एकूण १ लाख १० हजार रुपये खातेदाराच्या खात्यामध्ये जमा न करता आपल्या व्यक्तिगत कामासाठी वापरली. तसेच, खातेदार संजय रामटेके यांनी २२ जून २०२३ ला दोन हजार रुपये ठाणेगाव पोस्ट ऑफिसला येऊन त्यांच्या खाते क्रमांक ८९५७५३८०३२ मध्ये भरण्यासाठी डाकपाल जयश्री टेकाम हिला दिले होते. तिने रकमेची नोंद पुस्तकात केली व सही आणि शिक्का मारून दिला, परंतु ही रक्कम शाखा डाकघरच्या हिशेबात घेतली नाही. तसेच, टेकाम हिने बचत खाता कं. ८९५७५३८०३२ मधील रक्कम खातेधारकाची बनावट सही करून ६ डिसेंबर २०२२ ला २० हजार आणि ११ डिसेंबर २०२३ ला २० हजार रुपये काढले. खातेधारकाला माहीत न करता १० ऑक्टोबर २०२३ ला एक हजार रुपये खातेधारकाच्या खात्यात जमा सुद्धा केले. अशाप्रकारे एकूण ४१००० हजार रुपयांची रक्कम सरकारी खात्यामध्ये जमा न करता आपल्या व्यक्तिगत कामासाठी वापरली.

### डाकघराच्या हिशोबात रकमेची नोंदच केली नाही

**खातेदार कृष्णा गणेश चचाणे रा. मेंढा यांनी २ डिसेंबर २०२३ ला ३५०० रुपये ठाणेगाव शाखा डाकघरला येऊन त्यांच्या सुकन्या समृद्धी खाता क्र. ०१००३१३४३५९८ मध्ये भरण्यासाठी डाकपाल जयश्री टेकाम हिला दिले होते. टेकाम हिने या रक्कमची नोंद पुस्तकात केली व सही आणि शिक्का मारून दिला. परंतु, ही रक्कम शाखा डाकघरच्या हिशेबात घेतली नाही. ३५०० रुपये सरकारी खात्यामध्ये जमा न करता आपल्या व्यक्तिगत कामासाठी वापरली. तसेच खातेदार संगीता अविनाश चोबरे मु. पो. ठाणेगाव यांनी ६ फेब्रुवारी २०२३ ला पाच हजार रुपये आणि एक हजार रुपये ठाणेगाव शाखा डाकघरला येऊन आपल्या बचत खाता क्र. ०१००१२२७४९७० मध्ये भरण्यासाठी जयश्री टेकाम हिला दिले होते. टेकाम हिने या रक्कमेची नोंद पुस्तकात केली सही व शिक्का मारून दिला, परंतु ही रक्कम डाकघरच्या हिशेबात घेतली नाही.**

### बनावट सही करून पैसे केले विड्राल

**२४ जून २०२२ ला डाकपाल जयश्री टेकाम हिने खाते धारकाची बनावट सही करून तीन हजार रुपये विड्राल केले. खातेधारकांनी त्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी दिलेली रक्कम खात्यात जमा न करता व्यक्तिगत कामासाठी वापरली. तसेच, बनावट सही शिक्का मारून खातेदार व पोस्ट विभागाची एकूण १ लाख ६३ हजार ५०० रुपयांची अफरातफर केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.**

### डाक निरीक्षकाच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल

**उपविभागीय डाक निरीक्षक मनिष प्रभू ठवकर यांच्या तक्रारीवरून तिरोडा पोलिसांनी डाकपाल जयश्री टेकाम हिच्याविरुद्ध शुक्रवारी (दि. २) भांदविच्या कलम ४०९, ४२०, ४६८, ४७१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास तिरोडा पोलिस करीत आहेत.**

# तंबाखूजन्य पदार्थ विक्रेत्यांवर जिल्हा पोलिसांची करडी नजर

गोंदिया :–गंगाझरी पोलिस ठाण्यांतर्गत ग्राम मजितपूर येथे जिल्हा परिषद शाळेजवळ आरोपी अनिल सदाराम बतरा (४०, रा. सिंधी कॉलनी, गोंदिया) याच्या पानठेल्यात धाड घालून पोलिसांनी ३०० रुपये किमतीचे तसेच आरोपी दुर्गेश तेजराम पारधी (४१, रा. मजितपूर) याच्या पानठेल्यातून ४०० रुपये किमतीचे, आमगाव पोलिस ठाण्यांतर्गत ग्राम किडंगीपार येथे आरोपी प्रल्हाद उदल मारवाडे (३७, रा. किडंगीपार) याच्या पानठेल्यावर धाड घालून ७० रुपये किमतीचे, ग्राम रिसामा येथे सचिन नामदेव शेंडे (३६, रा. रिसामा) याच्या पानठेल्यातून १०५ रुपये किमतीचे, ग्राम अंजोरा येथे रामेश्वर पटले (३०, रा. अंजोरा) याच्या पानठेल्यातून १२५ रुपये किमतीचे, आरोपी सुखराम मोतीराम पंधराम (५१,रा. अंजोरा) याच्या पानठेल्यातून ४२५ रुपये किमतीचे, ग्राम पदमपूर येथे प्रदीप राधेश्याम वाकले (२८, रा. पदमपूर) याच्या पानठेल्यातून ४३५ रुपये किमतीचे तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले.

तसेच, दवनीवाडा पोलिस ठाण्यांतर्गत ग्राम रतनारा येथे आरोपी लक्ष्मीचंद नेतलाल चिखलोंडे (४४, रा. रतनारा) याच्या पानठेल्यावर धाड घालून ८२५ रुपये किमतीचे, आरोपी लक्ष्मण गरिबदास डोंगरे (४३, रा.रतनारा) याच्या पानठेल्यातून ६५ रुपये किमतीचे, ग्राम दवनीवाडा येथे मोरेश्वर लिलाधर कावळे (४५, रा. दवनीवाडा) याच्या चहाटपरीवर धाड घालून २३० रुपये किमतीचे, खुशाल मुरलीधर कावळे (४०, रा. दवनीवाडा) याच्या चहाटपरीतून २२० रुपये किमतीचे, ग्राम बिजाईटोला येथे हौशीलाल विठ्ठल नेवारे (४४, रा. बिजाईटोला) याच्या चहाटपरीतून ३४० रुपये किमतीचे, ग्राम खातीटोला येथे राजकुमार छोटेलाल धारकर (४२, रा. खातीटोला) याच्या चहाटपरीतून २४० रुपये किमतीचे तंबाखूजन्य पदार्थ पोलिसांनी धाड टाकून जप्त केले. पोलिसांनी सिगरेट व अन्य तंबाखूजन्य कायदा २००३ कलम ६ (ख), २४ अंतर्गत गुन्हा नोंद केला आहे. पोलिसांनी या कारवायांत या पानठेले व चहा टपऱ्यांमधून वेगवेगळ्या प्रकारचे तंबाखू, सिगारेट-बिडीचे पाकीट आदी साहित्य जप्त केले आहे. सर्व कारवायांतून एकूण तीन हजार ७८० रुपयांचा तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

# कचरा मोहल्ल्यातील १७ दुकाने भंगारजमा



**गोंदिया:–** नगर पालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी, याकरिता शहरातील कचरा मोहल्लयात काही वर्षांपूर्वी लाखो रूपये खर्चुन दुकान गाळे बांधण्यात आले. परंतु, अजूनही हे दुकान गाळे कोणालाही रोजगार उपलब्ध करून देऊ शकले नाहीत. कुलूपबंद असलेले हे गाळे साध्या धूळखात पडले आहेत. ऑनलाइन निविदा मागवूनही लिलावाकरिता अजूनही कोणी पुढे आला नसल्याचे नगर पालिका सांगत आहे. त्यामुळे नगरपालिकेचा गाळ्यांवरील लाखोंचा खर्च पाण्यात जाण्याची शक्यता आहे.

नगर पालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी, इतकेच नव्हे तर गरजूंना रोजगार उपलब्ध व्हावा, याकरिता नगरपालिकेने कचरा मोहल्यात दक्षिण व पश्चिमेला काही वर्षांपूर्वी १७ दुकान गाळ्यांचे बांधकाम केले. नगरपालिकेचा उद्देश चांगला असला, तरी हे गाळे आजघडीला शोभेची वस्तू बनून उभे आहेत. हे गाळे ना कोणाला रोजगार देऊ शकले, ना नगर पालिकेला आर्थिक उत्पन्न देऊ शकले. लाखो रूपयांचा खर्च मात्र, नगरपालिकेचा बांधकामावर करावा लागला. दुकान गाळे लिलावासाठी सहा महिन्यांपूर्वी चारवेळा ऑनलाइन निविदा मागविल्याचे नगरपालिका सांगत आहे. परंतु, अजूनपर्यंत कोणीही लिलावात सहभाग घेतला नाही. दुकान गाळे कुलूपबंद आहेत. या गाळ्यांभोवती आणि शटरजवळ कोणीही यावे, वास्तव्य करावे आणि निघून जावे, असा प्रकार सुरू आहे. असामाजिक तत्त्वांचा वावरही वाढला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकदेखील असुरक्षिततेचे जीवन जगत आहेत.

लिलाव प्रक्रिया का रखडली असावी, याचे उत्तरदेखील नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना सापडत नाही. लिलाव प्रक्रिया पुढेही रखडून राहिल्यास या गाळ्यांना उधई लागण्याची प्रसंगी, साहित्यांची मोठी नासाडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एवढेच नव्हे तर नगरपालिकेचे लाखो रुपये पाण्यात जायलाही वेळ लागणार नाही. या गाळ्यांचा प्रश्न त्वरित निकाली काढावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# कामठा येथील सामूहिक विवाह सोहळ्यात ७५ जोडपी विवाहबद्ध



**गोंदिया :–** माजी आ. गोपालदास अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रताप मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने ३० एप्रिल रोजी तालुक्यातील कामठा येथे सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता. यात ७५ जोडपी विवाहबद्ध झाली. विवाह सोहळ्याला विविध मान्यवरांनी उपस्थिती लावून विवाहबद्ध झालेल्या जोडप्यांना आशीर्वाद दिले.

यावेळी खा. प्रशांत पडोले, खा. नामदेव किरसान, आ. अभिजित वंजारी, मधू भगत, माजी आ. हेमंत पटले, भैरसिंग नागपुरे, दिलीप बन्सोड, हिना कावरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. प्रताप मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मागील अनेक वर्षांपासून सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. बुधवारी पार पडलेल्या सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यात ७५ जोडपी विवाहबद्ध झाली. सामूहिक विवाह सोहळ्यात विवाहबद्ध झालेल्या जोडप्यांना आयोजकांच्या वतीने सोन्याचे मंगळसूत्र, मिक्सर, सूटकेस, भांडी, पंखा आदी भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी माजी आ. गोपालदास अग्रवाल यांनी सांगितले की, प्रताप मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट गेल्या अनेक वर्षांपासून सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करीत आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन हा सामाजिक उपक्रम राबविला जात आहे. सामूहिक विवाह सोहळ्यामुळे गोरगरीब वधू-वरांच्या पालकांनासुद्धा मोठी मदत होत आहे. यात आयोजन समितीचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विवाह सोहळ्याचे कौतुक करीत केले.

# भेसळीच्या संशयावरुन टोस्ट हमसफर ब्रॉण्डचा साठा जप्त

**गोंदिया :–** अन्न व औषध प्रशासन गोंदिया कार्यालयास प्राप्त झालेल्या गुप्त माहितीच्या आधारे दि.३ मे २०२५ रोजी अन्न सुरक्षा अधिकारी पी.व्ही.मानवतकर यांनी गोंदिया शहरातील मेसर्स माँ शक्ती एजन्सीज, घमंडी बिअरबार जवळ, भैरव बाबा मंदिर समोर, बावली, गोंदिया या ठिकाणी छापा टाकून भेसळीच्या संशयावरुन बालाघाट येथून आलेला ङ्गटोस्टफ हमसफर ब्रॉण्डचा नमूना घेवून उर्वरित साठा ८८ किलो, किंमत ३५२० रुपये जप्त केला. सदरचे टोस्ट हे ६ किलोच्या कारटुन बॉक्समध्ये विक्रीस असल्याचे निदर्शनास आले. टोस्ट या अन्नपदार्थाच्या बॉक्सवर उत्पादकाचा पूर्ण पत्ता, उत्पादन दिनांक, बॅच नंबर, ऋडडअख परवाना क्रमांक नमूद नसल्याचे आढळून आले. सदर प्रकरणी विक्रेता अशोककुमार रहानदोमल ज्ञानचंदानी यांच्याकडून नमूना घेण्यात आलेला आहे व पुढील कार्यवाही सुरु आहे.

# गंगाझरी ते जुनेवारी मार्गावरील पुलाचे बांधकाम निकृष्ठ



**एकोडी :–**जुनेवारी ते गंगाझरी या मार्गावर पुलाचे बांधकाम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे होत असल्याचे लक्षात येताच गावकऱ्यांनी बांधकामस्थळी पोहचून मजुरांची विचारणा केली. दरम्यान काम कोणत्या विभागाकडून सुरू आहे या संदर्भात गंगाझरीचे सरपंच सोनु घरडे व जि.प. सदस्यांना विचारणा करण्यात आली असता, ते देखील कामाबद्दल अनभिज्ञच असल्याचे समोर आले. यामुळे कंत्राटदाराशी संपर्क साधले असता, कंत्राटदारांने गावकऱ्यांशी अररेरावी केली दरम्यान वन विभागाच्या अधिकाऱ्यांना पाचारण करून सदर काम बंद करण्यात आले. मात्र या प्रकाराला घेवून संबंधित यंत्रणेविरुद्ध नागरिकांमध्ये चांगलाच असंतोष निर्माण झाला आहे.

जुनेवारी ते गंगाझरी मार्गावर येणाऱ्या नाल्यावर पुलाचे बांधकाम सुरू आहे. परंतु बांधकाम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे होत असल्याने आगामी काळात समस्या कायम राहणार, ही बाब लक्षात येताच जुनेवारी व गंगाझरी येथील काही नागरिकांनी घटनास्थळ गाठून कामाबाबत मजुरांना विचारणा केली. दरम्यान सदर कामे कोणत्या विभागाच्या कोणत्या फंडातून होत आहे, या बाबत कंत्राटदाराशी भ्रमणध्वनीवर विचारणा करण्यात आली. तेव्हा कंत्राटदाराने तुम्ही कोण? माझ्याकडे वर्क आर्डर आहे, असे बोलले. यावर नागरिकांनी वर्क आर्डर व अंदाज पत्रकाची मागणी केली असता, कंत्राटदाराने अररेरावीपणाचा परिचय देत पोलिसात तक्रार करण्याची धमकी दिली. गावकऱ्यांनी निकृष्ठ बांधकामाविरुद्ध आक्रमक भूमिका घेत वन विभागाच्या अधिकाऱ्यांना बांधकामस्थळी पाचारण केले.

तेव्हा वन विभाग देखील या बांधकामापासून अनभिज्ञ असल्याचे समोर आले. दरम्यान गावकऱ्यांनी यंत्रणा तसेच कंत्राटदाराविरुद्ध संताप व्यक्त करीत काम बंद पाडले. यामुळे निकृष्ठ बांधकामाला घेवून गंगाझरी व जुनेवानी येथील नागरिकांमध्ये चांगला असंतोष निर्माण झाला आहे.

यावेळी वन विभागाचे वनपाल श्रीमती लारोकर, वनरक्षक राणे, वनहक्क समितीचे अध्यक्ष सुशिल टेकाम, जितेश सोलंकी, कुवरलाल मरस्कोल्हे, शैलेश वरकडे, ओमकार मडावी, डेनी वरकडे, महेंद्र मरस्कोल्हे, सोपाल पालेवार आदी नागरिक उपस्थित होते.

### ग्रामपंचायत प्रशासन अनभिज्ञच

**जुनेवारी ते गंगाझरी या मार्गावर पुलाचे बांधकाम केले जात आहे. परंतु या बांधकामापासून ग्रामपंचायत प्रशासन अनभिज्ञ असल्याचे समोर आले. निकृष्ठ दर्जाच्या बांधकामाला घेवून गावकऱ्यांनी सरपंच सोनु घरडे तसेच जि. प. सदस्य अश्विनी पटले यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधले असता, त्यांनी देखील या बाबत कसलीही माहिती नसल्याचे सांगितले. त्यामुळे कोणत्या विभागाकडून काम होत आहे, हे कुणास ठाऊक असा प्रश्न निर्माण झाला. तसेच संबंधित यंत्रणेला स्थानिक स्वराज्य संस्थेशी परवानगी घेण्याची गरज नाही का? असा सवालही नागरिकांकडून उपस्थित करण्यात आला. मालसुतो कार्यक्रमाच्या माध्यमातून संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी संगनमताने निकृष्ठ दर्जाचे काम करीत असल्याचा आरोपही गावकऱ्यांनी केला आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणीही गावकऱ्यांनी केली आहे.**



साप्ताहिक **बेरार टाईम्स** निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.०७ मे २०२५ 

# बांधावर जाऊन पालकमंत्री पाटील यांनी केली पिकांच्या नुकसानीची पाहणी

**गोंदिया :-** जिल्ह्यात २७ व २८ एप्रिल रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात रब्बी पिकांचे नुकसान झाले. धान, मका व भाजीपाला उत्पादकांचा तोंडचा घास अवकाळी पावसाने हिरावल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण कृषी व महसूल विभागाच्या यंत्रणेने त्वरित करावे. तसेच एकही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार यासाठी नुकसानीचे अचूक पंचनामे करण्याचे निर्देश पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले.



पालकमंत्री बाबासाहेब पाटील हे बुधवार आणि गुरुवारी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी जिल्ह्याचा दौरा करून अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले. जिल्ह्यात रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात रब्बी पिकाची लागवड केली जाते. यात धान, मका, भाजीपाला व फळबागांचा समावेश आहे. अर्जुनी मोरगाव व सडक अर्जुनी तालुक्यात मका व फळिपकांचे उत्पादन शेतकरी मोठ्या प्रमाणात घेतात. परंतु २७ व २८ एप्रिल रोजी जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने जिल्ह्यातील शेतकरी संकटात सापडला आहे.

अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची माहिती खा. प्रफुल्ल पटेल यांना देऊन त्वरित पंचनामे करण्यासाठी माजी आ. राजेंद्र जैन यांनी मागणी केली होती. त्याचीच दखल घेत पालकमंत्री बाबासाहेब पाटील हे जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता त्यांनी डव्वा व खजरी येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच शेतकऱ्यांशी चर्चा करून लवकरात लवकर पंचनामे करण्याचे निर्देश कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी आ. राजकुमार बडोले, माजी आ. राजेंद्र जैन, विनाश काशिवार, केतन वडगाये, निशा काशीवार, कविता रंगारी, सुधा रहांगडाले, डॉ. पटले, रजनी गिन्हेपुंजे, पुष्पमाला बडोले, रुपविलास कुरसुंगे, रमेश बडोले, अनिल बिलिया, राकेश जैन, भय्यालाल पुस्तोडे, डी. यू. रहांगडाले, अस्थिक परशुरामकर, मधुकर गावराने, दिनेश कोरे, भृंगराज परशुरामकर, मोंटू चव्हाण, मनोज गायकवाड, किशोर डोंगरवार, राजेश कापगते व शेतकरी उपस्थित होते.

# नकली खते आणि बियाणे विकणाऱ्यांवर कडक कारवाई करा: आमदार विनोद अग्रवाल

**गोंदिया:-** तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कृषी विभाग गोंदिया यांच्यावतीने पंचायत समिती सभापती कक्षात आमदार विनोद अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली खरीपपूर्व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या बैठकीत कृषी व पशुसंवर्धन सभापती दीपा सुधीर चंद्रिकापुरे, गोंदिया पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, उपसभापती शिवलाल जामरे, माजी उपसभापती निरज उपवंशी, जिल्हा परिषद सदस्या वैशाली पंढरे, आनंदा वाढिवे, पंचायत समिती सदस्य शैलेजा सोनवणे, उपविभागीय कृषी अधिकारी महेंद्र ठोकळे, वरिष्ठ शास्त्रज्ञ विशाल उबरहंडे, तालुका कृषी अधिकारी नेहा आढाव, कृषी अधिकारी एम.बी.ठाकूर, कृषी पर्यवेक्षक, तालुका तांत्रिक व्यवस्थापक एटीएमए व सर्व कृषी सहाय्यक उपस्थित होते.

बैठकीत आमदार विनोद अग्रवाल यांनी कृषी विभागाचा आढावा घेतला आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना गावनिहाय तीन ते चार प्रगतीशील शेतकऱ्यांची ओळख पटवावी, बनावट खते आणि बियाण्यांच्या विक्रीवर कडक कारवाई करावी आणि आंबा, पेरू, सीताफळ, सपोटा आणि तेलबिया यासारख्या फळबागांच्या लागवडीला प्रोत्साहन द्यावे असे निर्देश दिले. कृषी विभागाच्या सर्व योजना शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचतील याची खात्री करावी असेही त्यांनी सांगितले.

प्रत्येक योजनेचे फायदे शेतकऱ्यांपर्यंत वेळेवर पोहोचावेत, विभागाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यासाठी लक्ष्यापेक्षा जास्त काम करावे. नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीपासून वाचवण्यासाठी पंतप्रधान पीक विमा योजनेचे फायदे जास्तीत जास्त शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावेत, शेतकऱ्यांना योग्य वेळी बियाणे आणि खते उपलब्ध करून द्यावीत.

शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ मिळावा. नामांकित कंपनीचे प्रतिनिधी विम्यासाठी येतील याची माहिती लोकप्रतिनिधींना द्यावी. कृषी सहाय्यकांच्या गावभेटीचा कार्यक्रम लोकप्रतिनिधींना द्यावा. कृषी योजनांना प्रोत्साहन द्यावे. योजनेनुसार बाजारात पुरेशा प्रमाणात बियाणे, खते आणि कीटकनाशके उपलब्ध आहेत याची खात्री करावी. बियाण्यांच्या बाबतीत शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी विशेष लक्ष देण्याच्या सुचना केल्या.

कार्यक्रमाचे संचालन कृषी पर्यवेक्षक टी.एस. तुरकर यांनी केले. गोंदिया तालुक्यातील प्रगतशील शेतकरी आत्माराम पाचे (जगंतोला), हुसनलाल ठाकरे (सावरी), कमलेश ठाकरे, भूपेंद्र हरिणखेडे, सर्व विभागीय कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, अढचअ गोंदियाचे तालुका तांत्रिक व्यवस्थापक सुनील खडसे व सर्व सहाय्यक कृषी अधिकारी या आढावा बैठकीला उपस्थित होते.

# घोगरा- पाटीलटोला ते देव्हाळा खुर्द रस्त्यावर वनविभागाने खोदली नाली रस्ता रहदारीसाठी केला बंद



**तिरोडा:-** तालुक्यातील घोगरा-पाटीलटोला ते देव्हाळा खुर्द(तुमसर) रस्त्यावर वनविभाग तुमसर मोहाडी यांनी आज दिनांक ४/५/२०२५ ला जेसीबी च्या साह्याने रस्त्यावर नाली खोदून रस्ता रहदारीस बंद केला त्यामुळे सामान्य जनतेचे हाल होत आहेत.

एलोरा (देव्हाडा खू.) - पाटील टोला- घोगरा- ते घाटकुरोडा ते चांदोरी बूज - बिरोली- मांडवी - मुंडिपार - बेलाटी बूज ते तहसील कार्यालय तिरोडा हा अंदाजे २०० वर्षा पूर्वी पासून अस्तित्वात असलेला संयुक्त भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील रस्ता ह्या पूर्वी सन २००७ -२००८ या वर्षी प्रधान मंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत तुमसर ते तिरोडा मुख्य रस्ता देव्हाडा खू. येथ पर्यंत खडीकरण व डांबरीकरण चे करण्यात आले आहे. सन २०२४ मध्ये विजय भाऊ रहांगडाले आमदार तिरोडा यांनी परिसरातील विद्यार्थी, शेतकरी, मजूर व भंडारा, नागपूर जिल्ह्यातील जनतेची सतत ची मागणी व आक्रोश बघता सदर रस्ता मुख्य मंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत मंजुरी प्रदान केली असून सदर रस्ता बांधकाम सुरू आहे व जवळ जवळपास ९० टक्के बांधकाम पूर्णत्वास आले आहे. परंतु देव्हाडा खू येथील ग्राम पंचायतचे पदाधिकारी यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना वारंवार तक्रारी करून सदर रस्त्यावर आज गउइच्या साहाय्याने खोदून आडवी नाली तयार आहे व सदर रस्ता रहदारीस बंद करण्यात आला आहे. करीता याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सबंधित अधिकाऱ्यांनी तसेच व पदाधिकाऱ्यांनी जातीने लक्ष घालून तत्काळ प्रभावाने रस्ता रहदारीस सुरू करावा अशी परिसरातील नागरिकांची मागणी आहे.

# राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या जिल्हा अध्यक्षपदी चंद्रशेखर वैद्य

**गोंदिया:-** राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेची सभा दि.२६ एप्रिल रोजी संघटनेचे कार्यालय नविन प्रशासकीय भवन गोंदिया येथे पी.जी.शहारे अध्यक्ष जि.प.महासंघ यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

याच सभेत पेन्शन सह शासनाकडे प्रलंबित असलेल्या मागण्यांबाबत चर्चा करून दि.२० मे २०२५ रोजी अखिल भारतीय राज्य सरकारी कर्म चारी महासंघाने देशव्यापी संप करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंपात राज्य कार्यकारिणीच्या निर्णयानुसार जिल्ह्यातील सर्व कर्मचारी संपावर जातील असा निर्णय घेण्यात आला आहे. आणि जिल्हा कार्यकारिणीची निवड सर्वानुमते बिनविरोध करण्यात आलेली आहे.



जिल्हा अध्यक्ष चंद्रशेखर वैद्य, कार्याध्यक्ष प्रकाश ठाकरे, कोषाध्यक्ष विश्वनाथ कापगते, सरचिटणीस लिलाधर पाथोडे, सहसचिव आशिष रामटेके, उपाध्यक्ष राकेश डोंगरे, जिल्हा संघटक रमेश नामपललीवार, निलेश बांते आणी इतर पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आलेली आहे.

# कटंगीकलाचे तलाठी बिसेन आदर्श तलाठी पुरस्काराने पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित



**गोंदिया:-** विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखालील विभागीय निवड समितीने नागपूर विभागातील प्रत्येक जिल्ह्यातून उल्लेखनीय कार्यासाठी एका आदर्श तलाठ्याची निवड केली होती.त्यामध्ये गोंदिया तहसिल अंतर्गत येत असलेल्या कटंगीकला साझाचे तलाठी बिहारीलाल बिसेन यांची आदर्श तलाठी म्हणून निवड झाली होती. तलाठी बिसेन यांना १ मे, महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त कारंजा पोलीस मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते आदर्श तलाठी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलीस अधिक्षक गोरख भामरे, जि.प.सीईओ एम.म रगुनाथम, माजी आमदार राजेंद्र जैन, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहरे, उपविभागीय अधिकारी खंडाईत, तहसिलदार श्रीकांत कांबळे, तहसिलदार समशेर पठाण आदी उपस्थित होते.तलाठी बिसेन यांना आदर्श तलाठी पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच तलाठी मित्रांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# उड्डाण पूलाला बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्या!



**तिरोडा:-** खैरलांजी मार्गावरील मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र या दोन राज्याला जोडणाऱ्या आंतराज्यीय उड्डाण पुलाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाण पुल असे नाव देण्यात यावे, अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समीती तिरोडाच्या वतीने आमदार श्री. विजय रहांगडाले यांना करण्यात आली आहे. रविवारी (ता.४) आमदार श्री विजय रहांगडाले यांची भेट घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने त्यांना निवेदन देवून सविस्तर चर्चा करण्यात आली.

निवेदन देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक विजय बनसोड, उपाध्यक्ष राजेश गुनेरीया, महाप्रज्ञा बुध्द विहार समितीचे माजी अध्यक्ष अतुल गजभिये, जयंती उत्सव समितीचे सचिव जितेंद्र डहाटे, कोषाध्यक्ष विनोद चव्हाण, सदस्य रामू शहारे, राहुल मेश्राम, किशोर डहाटे यावेळी उपस्थित होते. दोन राज्यांना जोडणाऱ्या या उड्डाण पुलाची सुरुवात महाप्रज्ञा बुध्द विहाराजवळून होत आहे. शिवाय या भागात मोठ्याप्रमाणात आंबेडकरी अनुयायी राहतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आधुनिक भारताचे शिल्पकार असून भारतीय संविधानाची निर्मीती करून बाबासाहेबांनी या देशावर मोठे उपकार केले आहे.

शहरात डॉ बाबासाहेब यांचे नाव देण्यात आलेली एकही मोठी शासकीय वास्तू नसल्याचे समितीच्या वतीने मा. आमदार विजय रहांगडाले यांच्या लक्षात आणून देण्यात आले.

यावर विधायक प्रतिसाद देत उड्डाण पुलाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेच नाव देण्यात येईल, यासाठी सर्वोतोपरि प्रयत्न करू, अशी ग्वाही आमदार विजय रहांगडाले यांनी दिली. त्यामुळे आता खैरलांजी मार्गावरील उड्डाण पुलाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाण पुल असे नाभिधान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# इनक्युबेशन कम बिझनेस फॅसिलिटेशन सेंटरचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**गोंदिया:-** आज विविध क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान विकसीत करण्यात आले आहे. रोजगार निर्मितीला गती देण्यासाठी तसेच उद्योजकतेला चालना देण्याकरीता आज १ मे रोजी शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया येथे "इनक्युबेशन कम बिझनेस फॅसिलिटेशन सेंटर"चे राज्याचे सहकार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले.



यावेळी खासदार नामदेव किरसान, आमदार राजकुमार बडोले, जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर, उपाध्यक्ष सुरेश हर्षे, जिल्हाधिकारी प्रजित नायर, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम, पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले, शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया येथे जिल्हा नियोजन समिती गोंदिया मार्फत अंदाजे १ कोटी रुपये खर्च करुन अद्यावत तसेच नाविन्यपूर्ण इनक्युबेशन कम बिझनेस फॅसिलिटेशन सेंटर बनविण्यात आले असून जिल्ह्यातील नागरिकांच्या सेवेत आज १ मे २०२५ रोजी समर्पीत करण्यात येत आहे. याद्वारे उद्योजकतेला चालना देणे, रोजगार निर्मितीला गती देणे, कृषि व इतर उद्योगामध्ये नाविण्य घडविणे, गोंदियाला स्टार्ट हब बनविणे, स्टार्ट अपसाठी व्यवसायिक पाठबळ, महिला उद्योजकांसाठी विशेष प्रोत्साहन, व्यवसाय वाढीसाठी मार्गदर्शन, गुंतवणूक संधी व निधी मिळिवण्यासाठी मदत, कौशल्य विकास व प्रशिक्षण कार्यशाळा, संशोधन व उत्पादन विकास सहाय्य आदी बाबींवर भर देण्यात येणार आहे असे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी मानसी पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील धोंगडे, सा.बां.विभागाचे कार्यकारी अभियंता नरेश लभाने, न.प.मुख्याधिकारी श्रीकांत कांबळे, तहसिलदार समशेर पठाण, शासकीय तंत्रनिकेतन गोंदियाचे प्राचार्य चंद्रहास गोळघाटे, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त राजु माटे यांचेसह शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया येथील संपूर्ण स्टाफ उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस हा सर्वसामान्यांचा पक्ष-माजी आमदार राजेन्द्र जैन

**गोंदिया:-** राष्ट्रवादी काँग्रेस हा शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेचा पक्ष आहे. खा.प्रफुल पटेल यांनी नेहमीच सर्वसामान्य व्यक्तीला केंद्र स्थानी ठेवून विकासाची कामे केली आहेत. ती कामे जनतेपर्यंत पोहचिण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावा. खा.पटेल सारखे सक्षम नेतृत्व आपल्या पाठीशी असुन सर्व सामान्य जनतेच्या समस्या जाणून त्या सोडवण्याचा पक्ष पदाधिकारी व कार्यकर्तानी प्रयत्न करावा. जनतेच्या अडचणी सोडवल्यास सामान्य माणूस पक्षाशी जोडला जातो. पक्ष संघटन मजबूती साठी जास्तीत जास्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सभासद नोंदणी करावी. पक्ष सभासद नोंदणी व पक्षाचा विस्तार करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जनसामान्यांपर्यन्त पोहचविण्याचा प्रयत्न करावा असे प्रतिपादन राजेंद्र जैन यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका गोंदिया अंतर्गत राजेश कटरे यांचे निवास स्थान एकोडी येथे एकोडी जिल्हा परिषद क्षेत्राकरीता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सदस्यता अभियानाची सुरुवात माजी आमदार राजेंद्र जैन, विनोद हरिणखेडे,.राजेश कटरे, सौ.अश्विनीताई रविकुमार पटले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.



# सहा.प्रशासन अधिकारी संजय बनकर व वरिष्ठ सहाय्यक निखिल बागडे ठरले उत्कृष्ठ कर्मचारी



**गोंदिया:-** जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय विभागात सन २०१४-२५ या आर्थिक वर्षात काम करतांना दिलेले काम तसेच आपल्या कामाशी प्रामाणिकपण निष्ठा ठेवत कर्त्यव्य पार पाडतांना उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या कर्मचारी वर्गाचा सत्कार १ मे महाराष्ट्र दिन व गोंदिया जिल्हा वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या प्रांगणात करण्यात आला.

झेंडावंदन कार्यक्रमानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या हस्ते गोंदिया जिल्हा परिषद अंतर्गत येत असलेल्या गोरेगाव पंचायत समितीचे सहाय्यक प्रशासन अधिकारी संजय बनकर तसेच जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागातील वरिष्ठ सहाय्यक निखिल बागडे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यांच्यासोबतच ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता आर.आर. सतदेवे, अभिसरण योजना यशश्वी करण्यात सहकार्य करणारे बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता निल कट्यारमल, स्नेहा कुथे पर्यवेक्षक, निशा बोदेले केंद्रप्रमुख, ग्राम विकास अधिकारी सुमेध बनसोड, सुरेखा ब्राह्मणकर, अझज नरेगा, सूर्यभान पाचे संगणक परिचालक, डॉ.शहजादा वैद्यकीय अधिकारी, वंदना निकोडे आशा सेविका अशा बारा कर्मचा-यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुंगनाथम, जि.प.उपाध्यक्ष सुरेश हर्षे, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मधुकर वासनिक, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.कुतीरकर, कार्यकारी अभियंता सत्यजित राऊत यांच्यासह याप्रसंगी जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी व जिल्हा परिषदेतील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खोडशिवनी येथे कंपोस्ट खड्डा भरू, गाव स्वच्छ सुंदर ठेवू अभियानाचा शुभारंभ

**सडक अर्जुनी:-** तालुक्यातील खोडशिवणी येथे १ मे २०२५ रोजी ङ्कंपोस्ट खड्डा भरू, गाव स्वच्छ सुंदर करूङ्क अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद गोंदिया बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता ए. एम. हटवार, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे सल्लागार भागचंद्र रहांगडाले, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे वासनिक, सरपंच गंगाधर परशुरामकर, पंचायत समिती सदस्य डॉ. रूखीराम वाढई, ग्रामपंचायत अधिकारी ओमेश्वर कापगते आदी उपस्थित होते.

यावेळी पाणी व स्वच्छता विभाग जिल्हा परिषद गोंदियाचे भागचंद्र रहांगडाले यांनी अभियानाचे उद्देश विशद करून माहिती सांगितली. त्यानंतर उपकार्यकारी अभियंता हटवार, सरपंच गंगाधर परशुरामकर, पंचायत समिती सदस्य डॉ.वाढई, ग्रामपंचायत अधिकारी ओमेश्वर कापगते व इतरांच्या हस्ते कंपोस्ट खड्डा भरून अभियानाला सुरुवात करण्यात आली.




# पर्यटकांची पावले वळली नागझिरा व्याघ्र प्रकल्पाकडे

## ३६ हजार पर्यटकांनी केली जंगल सफारी

**गोंदिया:-** सिमेंट कॉंक्रीटच्या जंगलातून निघून निसर्ग सान्निध्यात आपला वेळ घालविण्यासाठी नागरिकांची पावले आता जंगलांकडे वळू लागली आहेत. विशेष म्हणजे, व्याघ्र प्रकल्पात वाघोबांचा अधिवास असून त्यांचे हमखास दर्शन होते. हेच कारण आहे की, वर्ष २०२४-२५ मध्ये (मार्च ते एप्रिल) नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात ३६ हजार ५९२ पर्यटकांनी भेट देत जंगल सफारी केली आहे.



माणसाला या धकाधकीच्या जीवनात काही काळ निवांत घालविण्यासाठी निसर्ग सान्निध्याची गरज भासत आहे. यासाठी वनविभागाने राखून ठेवलेल्या जंगलांकडे त्यांची पावले आपसूकच वळत आहेत. हेच कारण आहे की, शहरी नागरिकांचा कल आता वनपर्यटनाकडे दिसत आहे.

जिल्हावासीयांसाठी नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प वरदान ठरत असून, येथे वाघोबाच्या दर्शनासाठी नेहमीच पर्यटकांची गर्दी असते. जिल्हा व राज्यातीलच नव्हे, तर परराज्य व विदेशातील पर्यटकसुद्धा नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात जंगल सफारीसाठी येत आहेत.

### ९४.६० लाख रुपयांचा मिळाला महसूल

व्याघ्र प्रकल्पात जंगल सफारीसाठी जाणाऱ्या पर्यटकांसाठी प्रवेश शुल्क आकारला जात असून, याशिवाय वाहन व कॅमेरा शुल्क आकारले जाते. तसेच एका वाहनासाठी एक गाइड सोबत घ्यावा लागतो. अशाप्रकारे वर्षभरात वनविभागाला ९४ लाख ६० हजार २० रुपयांचा महसूल मिळाला आहे. यामध्ये ऑफलाइन पर्यटक व त्यांच्या वाहन शुल्कातून ५४ लाख ५४ हजार ६८ रुपये, तर ऑनलाइन पर्यटक व त्यांच्या वाहन शुल्कातून ३४ लाख १६ हजार ४९६ रुपयांचा महसूल मिळाला आहे. नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प पावसाळ्यात बंद ठेवला जात असून, एवढा काळ सोडला असता नेहमीच पर्यटकांची गर्दी असते. मात्र, असे असतानाही जून महिन्यात सर्वाधिक आठ हजार ३३४ पर्यटकांनी जंगल सफारी केल्याचे दिसून येत आहे. यामध्ये पाच हजार ४६ पर्यटकांनी ऑफलाइन बुकिंगद्वारे, तर तीन हजार २८८ पर्यटकांनी ऑनलाइन बुकिंगद्वारे व्याघ्र प्रकल्पाला भेट दिली असून, जंगल सफारीचा आनंद लुटला आहे.